सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागांकडे सोपविलेले विषय



महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

२०२४

# महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागांकडे सोपविलेले विषय

## प्रस्तावना

संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये राज्य विधानमंडळ ही महत्त्वाची संविधानात्मक संस्था असून राज्याचा अर्थसंकल्प मंजूर करण्यापासून ते विविध कायदे बनविणे व असलेल्या कायद्यात वेळोवेळी कालानुरूप दुरुस्त्या करण्यासह अनेक महत्त्वाचे निर्णय येथे घेतले जातात.

लोकशाही शासन पद्धतीत कार्यकारी मंडळ हे कायदे मंडळास जबाबदार असते व विधानसभेत बहुमत धारण करत असेपर्यंतच सत्तेवर राहू शकते. विधानमंडळात नागरिकांचे प्रतिनिधी निवडून दिले जात असून प्रत्येक सदस्य आपल्या मतदार क्षेत्रातील जनतेचे प्रतिनिधीत्व करून शासनाच्या विविध ध्येय धोरणांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशील असतात. शासनाला लोकांप्रती उत्तरदायी बनविण्यासाठी व जबाबदार शासन पद्धती निर्माण करण्यासाठी विधानमंडळाच्या सदस्यांना विविध संसदीय आयुधांचा अवलंब करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्यापैकी प्रश्न हे महत्त्वाचे संसदीय आयुध असून विधिमंडळाचे कार्यकारी प्रशासनावरील नियंत्रण प्रस्थापित करणारे आयुध म्हणून ते विकसित झाले आहे.

विधानसभा व विधानपरिषदेच्या प्रचलित नियमानुसार प्रश्नांच्या सूचना देण्यासाठी शासनाच्या विविध विभागांकडे सोपविलेल्या विषयांची अद्ययावत माहिती विधानमंडळ सदस्यांना असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांकडे सोपविलेल्या विषयांची माहिती देण्यात आली आहे. (सामान्य प्रशासन विभाग, क्र.आरओबी १०७५/ओ ॲण्ड एम, दिनांक २६ जून, १९७५ अन्वये प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना) तसेच कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ पर्यंत सुधारणा करून सूची अद्ययावत करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीच्या आधारे या सचिवालयाकडून विधानमंडळाच्या सदस्यांसाठी 'महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागांकडे सोपविलेले विषय' ही माहिती पुस्तिका मुद्रित करण्यात येत असते. सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवनिर्वाचित विधानसभा सदस्यांसाठी सदर माहिती पुस्तिका मुद्रित करण्यात आली होती. सद्यःस्थितीत उक्त माहिती पुस्तिका मुद्रित करून पाच वर्षांचा कालावधी झालेला आहे. या कालावधीत शासनाच्या विविध विभागांमध्ये विषयांचे झालेले हस्तांतरण व नव्याने समाविष्ट करण्यात आलेले तसेच वगळण्यात आलेले विषय विचारात घेऊन शासनाच्या कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये दरम्यानच्या कालावधीत केलेल्या सुधारणांप्रमाणे सदर माहिती पुस्तिका अद्ययावत करून पुनर्मुद्रित करणे आवश्यक होते.

त्याप्रमाणे सदर सुधारणा या माहिती पुस्तिकेत करण्यात आल्या असून माहिती पुस्तिकेची पुनर्मुद्रित प्रत मा.सदस्यांच्या माहितीकरिता प्रस्तुत करण्यात येत आहे. मा.सदस्यांना ही पुस्तिका सभागृहाच्या कामकाजाच्या दृष्टीने निश्चितच उपयुक्त ठरेल.

**विधान भवन :**

मुंबई, सचिव (१) (कार्यभार),

दिनांक : नोव्हेंबर, २०२४. महाराष्ट्र विधामंडळ सचिवालय.

## विषय सूची



| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (एक) | प्रस्तावना | तीन |
| (दोन) | शासनाचे मंत्रालयीन विभाग, विभागांचे उप विभाग आणि त्या विभागाचे मंत्री/ राज्य मंत्री यांच्या खाते वाटपामध्ये सर्वसाधारणपणे समावेश करण्यात येतात असे प्रमुख विषय. | १ |
| (तीन) | शासनाचे विभाग | |
| १ | सामान्य प्रशासन विभाग | ६ |
| २ | गृह विभाग | ११ |
| ३ | महसूल व वन विभाग | १७ |
| ४ | कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | २२ |
| ५ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | २५ |
| ६ | नगरविकास विभाग | २८ |
| ७ | वित्त विभाग | ३१ |
| ८ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ३४ |
| ९ | जलसंपदा विभाग | ३६ |
| १० | विधि व न्याय विभाग | ३८ |
| ११ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | ४१ |
| १२ | ग्रामविकास विभाग | ४६ |
| १३ | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ४९ |
| १४ | नियोजन विभाग | ५२ |
| १५ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | ५४ |
| १६ | संसदीय कार्य विभाग | ५६ |
| १७ | गृहनिर्माण विभाग | ५९ |
| १८ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | ६१ |

| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १९ | सार्वजनिक आरोग्य विभाग | ६२ |
| २० | वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग | ६३ |
| २१ | आदिवासी विकास विभाग | ६४ |
| २२ | पर्यावरण विभाग | ६६ |
| २३ | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | ६७ |
| २४ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ७१ |
| २५ | महिला व बालविकास विभाग | ७३ |
| २६ | कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग | ७५ |
| २७ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | ७६ |
| २८ | अल्पसंख्याक विकास विभाग | ७९ |
| २९ | मराठी भाषा विभाग | ८१ |
| ३० | इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग | ८२ |
| ३१ | मृद व जलसंधारण विभाग | ८४ |

# शासनाचे मंत्रालयीन विभाग, विभागांचे उप विभाग आणि त्या विभागाचे मंत्री/राज्य मंत्री यांच्या खाते वाटपामध्ये सर्वसाधारणपणे समावेश करण्यात येतात असे प्रमुख विषय

## १. सामान्य प्रशासन विभाग

(एक) सर्वसाधारण उप विभाग

(दोन) सेवा उप विभाग

(तीन) माहिती तंत्रज्ञान व प्रशासकीय पुनर्रचना

(चार) माहिती व जनसंपर्क उप विभाग

(पाच) विज्ञान व तंत्रशास्त्र कक्ष

(सहा) सामाजिक विकास समन्वय उप विभाग

(सात) सर्वसाधारण

## २. गृह विभाग

(एक) कायदा व सुव्यवस्था विभाग

(दोन) तुरुंग विभाग

(तीन) राज्य उत्पादन शुल्क विभाग

(चार) परिवहन विभाग

(पाच) सर्वसाधारण

## ३. महसूल व वन विभाग

(एक) महसूल विभाग

(दोन) आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग

(तीन) वन विभाग

(चार) सर्वसाधारण

## ४. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(एक) कृषी विभाग

(दोन) फलोत्पादन विभाग

(तीन) दुग्धविकास, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभाग

(चार) सर्वसाधारण

**५. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

(एक) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

(दोन) सर्वसाधारण

**६. नगरविकास विभाग**

(एक) नगरविकास विभाग

(दोन) सर्वसाधारण

**७. वित्त विभाग**

(एक) वित्त विभाग

(दोन) सर्वसाधारण

**८. सार्वजनिक बांधकाम विभाग**

(एक) सार्वजनिक बांधकाम विभाग

(दोन) सर्वसाधारण

**९. जलसंपदा विभाग**

(एक) पाटबंधारे

(दोन) सर्वसाधारण

(तीन) जलसंपदा

**१०. विधि व न्याय विभाग**

(एक) विधि व न्याय उप विभाग

(दोन) सर्वसाधारण

**११. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

(एक) उद्योग विभाग

(दोन) ऊर्जा विभाग

(तीन) खाणकाम व भूशास्त्रीय सर्वेक्षण

(चार) कामगार विभाग

(पाच) सर्वसाधारण

**१२. ग्रामविकास विभाग**

(एक) ग्रामविकास विभाग

(दोन) सर्वसाधारण

**१३. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

(एक) अन्न

(दोन) नागरी पुरवठा

(तीन) ग्राहक संरक्षण

(चार) सर्वसाधारण

**१४. नियोजन विभाग**

(एक) नियोजन विभाग

(दोन) सर्वसाधारण

**१५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

(एक) सामाजिक न्याय विभाग

(दोन) दारूबंदी प्रचार कार्य उप विभाग

(तीन) व्यसनमुक्ती कार्य उप विभाग

(चार) सर्वसाधारण

**१६. संसदीय कार्य विभाग**

(एक) संसदीय कार्य विभाग

(दोन) सर्वसाधारण

**१७. गृहनिर्माण विभाग**

(एक) गृहनिर्माण विभाग

(दोन) सर्वसाधारण

**१८. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग**

(एक) पाणी पुरवठा व स्वच्छता उप विभाग

(दोन) सर्वसाधारण

**१९. सार्वजनिक आरोग्य विभाग**

(एक) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग

(दोन) सर्वसाधारण

**२०. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग**

(एक) वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग

(दोन) औषधिद्रव्ये विभाग

(तीन) सर्वसाधारण

**२१ आदिवासी विकास विभाग**

(एक) आदिवासी विकास विभाग

(दोन) सर्वसाधारण

**२२ पर्यावरण विभाग**

(एक) पर्यावरण विभाग

(दोन) सर्वसाधारण

**२३ सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

(एक) सहकार विभाग (पत व साखर)

(दोन) सहकार विभाग (पणन)

(तीन) वस्त्रोद्योग विभाग

(चार) सर्वसाधारण

**२४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

(एक) उच्च शिक्षण विभाग

(दोन) तंत्र शिक्षण विभाग

(तीन) संस्कृती विभाग

(चार) सर्वसाधारण

**२५. महिला व बालविकास विभाग**

(एक) महिला व बालविकास विभाग

(दोन) सर्वसाधारण

**२६. कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग**

(एक) कौशल्य विकास आणि उद्योजकता उप विभाग

(दोन) सर्वसाधारण

**२७. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**

(एक) पर्यटन विभाग

(दोन) सांस्कृतिक कार्य विभाग

(तीन) सर्वसाधारण

**२८. अल्पसंख्याक विकास विभाग**

(एक) अल्पसंख्याक विकास उप विभाग

(दोन) सर्वसाधारण

**२९. मराठी भाषा विभाग**

**३०. इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग.**

**३१. मृद व जलसंधारण विभाग**

## १. सामान्य प्रशासन विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. सर्वसाधारण उप विभाग

१. राज्यपालांची नियुक्ती व रजा.

२. राज्यपालांच्या निवासाबाबतचा खर्च (बांधकामावरील खर्चासहित).

३. मंत्रिपरिषदेच्या बैठकांची व्यवस्था करणे.

४. उच्च न्यायाधीशांची नियुक्ती.

५. विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांच्या नियुक्त्या (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक १७ पहा).

६. मुंबईच्या शेरिफची नियुक्ती करणे.

७. आंतरराज्य स्थलांतर.

८ अमेरिकेच्या संयुक्त राज्यातील केअर, आयएनसी किंवा इतर संघटनांकडून किंवा इतर कोणत्याही विदेशांकडून मिळालेल्या देणग्या.

९. युरोपियन स्मशाने यांसहित धर्म खात्यासंबंधीचे व्यवहार (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक ३ आणि ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक १४ पहा).

१०. आतिथ्यकारी संघटना.

११. राजशिष्टाचार.

१२. विशेष मान्यवर व्यक्तींचे स्वागत इत्यादींसह समारंभ, राष्ट्रीय पोषाख, अधिकृत शोक समारंभ, इत्यादी.

१३. वाणिज्यिक अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, रजा इत्यादी.

१४. अग्रक्रम अधिपत्र व अग्रक्रम तक्ता.

१५. मंत्रालयीन विभागांच्या भारताच्या संविधानाशी संबंधित कामकाजाचे समन्वयन.

१६. संविधानातील तरतुदींच्या आणि संसदेने कायद्याद्वारे केलेल्या कोणत्याही कायद्याच्या अधीनतेने लोकसभा व राज्य विधानसभा यांच्या निवडणुका.

१७. जनगणना.

१८. सरंजाम.

१९. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (सादरकर्ता अधिकारी व तद्नुषंगिक बाबी वगळून), (तसेच विधि व न्याय विभागाखालील नोंद क्रमांक ७ पहा).

२०. साहित्यिक व वैज्ञानिक मंडळे.

२१. राजकीय निवृत्तीवेतने आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यात ज्यांनी भाग घेतला होता अशा व्यक्तींची निवृत्तीवेतने.

२२. माजी सैनिकांचे पुनर्वसन

(एक) महाराष्ट्र राज्य सैनिक, नाविक व वैमानिक मंडळ आणि प्रशिक्षण केंद्र.

(दोन) पूर्वछात्रसैनिक प्रशिक्षण केंद्रे.

(तीन) खाद्य केंद्रे.

(चार) सैनिकी कर्मचारी वर्गास शौर्य पुरस्कार देणे.

२३. बृहन्मुंबईमध्ये शासकीय कार्यालयांना सरकारी जागेचे वितरण.

२४. डाक, तार व दूरध्वनी परंतु यामध्ये ग्रामीण दूरध्वनी व्यवस्था, बिनतारी संदेश व्यवस्था आणि दळणवळणाच्या इतर व्यवस्थांचा समावेश होणार नाही.

२५. मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री आणि उपमंत्री यांच्या आस्थापनेसंबंधीच्या बाबी.

२६. शासकीय वाटपातून मोटारगाड्या, स्कूटर आणि इतर यंत्रचलित वाहने यासंबंधीच्या बाबी (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक ४२ पहा).

२७. मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम, १९४८ (१९४८ चा तेहतीस) खालील जागांचे अधिग्रहण.

२८. पोलीस गृहनिर्माण योजनेखाली बांधकाम झालेल्या जागेतील निवासी स्थानाच्या वितरणाव्यतिरिक्त बृहन्मुंबईमधील शासकीय कर्मचाऱ्यांना निवासस्थानाचे वितरण करणे (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक ५ पहा).

२९. सचिवालयीन स्थायी आदेश, शासकीय अभिलेख, विज्ञापन, जनतेतील कोणत्याही व्यक्तीकडून आलेल्या तक्रारी व व्यपदेशन निकालात काढण्यासंबंधीचे नियम इत्यादी, शासकीय पत्रव्यवहार.

३०. सार्वजनिक सुट्टया.

३१. मुंबई इलाखा शहर युद्ध व सहायता निधी.

३२. प्रशासकीय अहवाल.

३३. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना कपडा, गणवेश, कांबळी व छत्र्यांचा पुरवठा करणे.

३४. धर्मादाय प्रयोजन निधीकरिता मुख्यमंत्र्यांची देणगी.

३५. शासकीय परिवहन सेवा.

३६. वायूमार्ग, विमान व विमान चालन, विमानतळांची तरतूद, विमान वाहतूक आणि विमानतळ यांचे विनियमन व संघटन, वैमानिक शिक्षण व प्रशिक्षणाची तरतूद आणि राज्य व इतर अभिकरणे यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या अशा शिक्षणाचे व प्रशिक्षणाचे विनियमन.

३७. बृहन्मुंबई व नवी मुंबईमधील शासकीय जागेतील जागांचे अशासकीय संस्थांना वितरण करणे.

३८. राज्य निवडणूक आयोग.

३९. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद.

## दोन. सेवा उप विभाग

४०. राज्य लोकसेवा आयोग.

४१. महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम निवड) मंडळ.

४२. अखिल भारतीय सेवा संबंधातील सर्वसाधारण धोरणाच्या बाबी (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ४३, गृह विभागाखालील नोंद क्रमांक ३, महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक ४५ व वित्त विभागाखालील नोंद क्रमांक २३ पहा).

४३. भारतीय प्रशासन सेवा व त्याखालील पदे यांच्या व्यवस्थापनावर परिणामक असलेल्या भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या संबंधातील नियुक्त्या, बदल्या, प्रतिनियुक्त्या, रजा, शिस्तभंगाची कारवाई इत्यादी यांसह सर्व बाबी.

४४. सर्व आस्थापनांचे अधिकार व वैध हितसंबंध सुरक्षित ठेवणे.

४५. वर्गीकरण व सेवाप्रवेश नियम.

४६. भारतातील सर्व नागरिकांना रोजगाराच्या समान संधी सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना आणि सार्वजनिक सेवेमध्ये आर्थिकदृष्ट्या मागासवर्गांसह पुरेसे प्रतिनिधित्व.

४७. शासकीय कर्मचारी वर्तणूक नियम, शिस्त व अपील नियम.

४८. महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा पालन अधिनियमाचे प्रशासन (तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक ५० पहा).

४९. शासकीय कर्मचाऱ्यांच्या विभागीय व प्रादेशिक भाषा परीक्षा घेणे.

५०. आय.सी.एस. कुटुंब वेतन निधी व अत्युच्च सेवा यांसह कुटुंब वेतन निधी नियमावली (भारतीय कुटुंब वेतन निधी).

५१. भविष्यनिर्वाह निधी नियम (जे अखिल भारतीय सेवांशी संबंधित असतील त्यासह).

५२. शासकीय कर्मचारी संघटना.

५३. राज्य सेवेतील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, पदस्थापना, बदल्या, वर्तणूक, रजा मंजूर करणे इत्यादी.

५४. केंद्रीय अभिकरणे आणि संशोधनाच्या विशेष अभ्यासाच्या प्रवर्तनासाठी व्यावसायिक, औद्योगिक किंवा तांत्रिक प्रशिक्षणासंबंधीचे निदेशन.

५५. महाराष्ट्र लोकआयुक्त व उप लोकआयुक्त अधिनियम, १९७१.

५६. चौकशी आयोग.

५७. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी रोजगाराच्या पुरेशा संधी व राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली सेवांमध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करून देण्यासंबंधी सर्व बाबी.

**तीन. माहिती तंत्रज्ञान व प्रशासकीय पुनर्रचना**

५८. कार्य नियमावली व त्याखालील अनुदेश.

५९. रचना व कार्यपद्धती.

६०. कार्याभ्यास.

६१. विशेष प्रकल्प (सुवर्ण त्रिकोण, मुंबई विकास)

६२. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमी, पुणे.

६३. माहिती तंत्रज्ञान व तद्नुषंगिक बाबी.

६४. बृहन्मुंबईत शासकीय दूरध्वनीचे वितरण.

६५. सार्वजनिक व खाजगी क्षेत्राच्या परस्पर सहभागातून पायाभूत सुविधांचा विकास.

**चार. माहिती व जनसंपर्क उप विभाग**

६६. माहिती, जनसंपर्क, प्रसिद्धी व ग्रामीण ध्वनिक्षेपण.

६७. प्रसारण. (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक २४ पहा)

६८. अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने यांचे कार्यालय.

६९. वृत्तपत्रे, पुस्तके व मुद्रण प्रक्रिया (मुद्रण व ग्रंथ नोंदणी अधिनियम, १८६७ व मुद्रित बाबींशी संबंधित इतर विधिविधाने यांसह), (तसेच शालेय शिक्षण विभागाखालील नोंद क्रमांक ३९, उच्च व तंत्र शिक्षण विभागाखालील नोंद क्रमांक २३ आणि उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील नोंद क्रमांक १८ पहा).

७०. प्रदर्शनासाठी चल चित्रपटांना मंजुरी देणे.

७१. भारतीय चित्रपटांच्या निर्मितीला व वितरणास उत्तेजन देणे आणि शैक्षणिक व शास्त्रीय चित्रपटांचे प्रदर्शन व उपयोग (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक २३ पहा).

## पाच. विज्ञान व तंत्रशास्त्र कक्ष

७२. विज्ञान व तंत्रज्ञानासंबंधी बाबी.

## सहा. सामाजिक विकास समन्वय उप विभाग

७३. प्रकल्प एकसंघ, सामाजिक न्याय निर्देशांक, सामाजिक न्याय अहवाल सामाजिक उत्तरदायित्व अधिनियम, सामाजिक लेखा परीक्षण नियंत्रण व सामाजिक न्यायाची आघाडी.

७४. नवीन योजना व संकल्पनांचा समन्वय.

७५. सामाजिक विकास क्षेत्रातील योजना व कार्यक्रम यांचे संनियंत्रण.

## सात. सर्वसाधारण

७६. कार्यनियमावलीच्या पहिल्या सूचीमध्ये इतरत्र उल्लेख न केलेले कोणतेही विषय.

७७. सामान्य प्रशासन विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची थकबाकी निर्लेखित करणे.

७८. या सूचीमधील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

७९. या सूचीतील कोणत्याही बाबींसंबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

८०. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित किंवा शासनाच्या ताब्यातील आणि सामान्य प्रशासन विभागाला नेमून दिलेली कामे, जमिनी व इमारती.

## २. गृह विभागाला नेमून दिलेले विषय

**एक. कायदा व सुव्यवस्था विभाग**

१. सार्वजनिक सुव्यवस्था (तसेच या सूचीतील नोंद क्रमांक २४ पहा).

२. रेल्वे व ग्रामीण पोलीस यांसह पोलीस.

३. भारतीय पोलीस सेवा व त्याखालील पदे यांच्या व्यवस्थापनाशी संबंधातील पदस्थापना, बदल्या, पदोन्नती, प्रतिनियुक्ती, रजा, शिस्तभंगाची कारवाई यासह सर्व बाबी (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ४२ पहा).

४. पोलीस कर्मचारीवर्गासाठी घरबांधणी (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक २२ पहा).

५. पोलीस गृहनिर्माण योजनांखाली पोलीस कर्मचाऱ्यांना बांधकाम केलेल्या जागेतील निवासस्थानांचे वाटप करणे.

६. (एक) मुंबई लॉटरी (नियंत्रण व कर) आणि बक्षीस स्पर्धा (कर आकारणी) अधिनियम, १९५८.

(दोन) बक्षीस स्पर्धा अधिनियम, १९५५.

(तीन) महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) अधिनियम, १९७६.

७. पैज लावणे व जुगार.

८. या सूचीतील कोणत्याही बाबीसंबंधात कायद्याविरुद्धचे अपराध.

९. फौजदारी प्रक्रिया संहितेखाली खटले काढून घेणे.

१०. गुन्हेगारी प्रवृत्तीचे वेडे (तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाखालील नोंद क्रमांक ३ पहा).

११. अपराधी व वेडे यांच्यावर आदेशिका बजावणे.

१२. विस्फोटक पदार्थ.

१३. पेट्रोलियम अधिनियम, १९५४, कार्बाईड व कॅल्शियम नियम यान्वये पेट्रोलियम व अन्य ज्वालाग्राही पदार्थांचे नियंत्रण, परिवहन, साठवण, निर्मिती, परिष्करण आणि संमिश्रण करणे (तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक ४४ पहा).

१४. एक्झुमेशन (मृतदेह उकरून बाहेर काढणे) हरवलेल्या व्यक्ती, मृत व्यक्तींची मालमत्ता.

१५. ब्रोस्टल शाळा व संस्था यांचे प्रशासन (तसेच महिला व बालविकास विभागाखालील नोंद क्रमांक ३ पहा).

१६. शस्त्रे, दारुगोळा हत्यारे व दारुगोळा.

१७. कार्यकारी दंडाधिकाऱ्याचा दंडाधिकार काढून घेणे (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ५ पहा).

१८. राज्याचा कोणताही कायदा अंमलात आणण्यासाठी दंड, शास्ती किंवा तुरुंगवास याद्वारे विधिविधानाद्वारे लादण्यात येणाऱ्या शिक्षांच्या संबंधातील सर्व विधेयकाच्या खंडांची तपासणी करणे.

१९. अपमृत्यू निर्णता.

२०. संघराज्याचे नाविकदल, सेनादल व वायूदल आणि केंद्रीय गुप्तवार्ता केंद्र आणि पुढील बाबींचा असलेले अन्वेषण—

(एक) भारताची अंतर्गत सुरक्षा व संरक्षण (नाविक, सेना किंवा वायू), (नागरी अधिकारांच्या मदतीसाठी नाविक दल, सेना दल किंवा वायुदल यांच्या वापरांसह) अंतर्गत सुरक्षा संबंधित बाबी.

(दोन) साह्यकारी व भारतीय प्रादेशिक दले.

(तीन) भारतीय स्थल सेनेच्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नती.

(चार) सैन्याचा सेवा प्रवेश व वाहतूक.

(पाच) इतर संकीर्ण सैनिकी बाबी.

२१. बोधचिन्हे व नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम, १९५०.

२२. गोपनीय व गुप्त संकेत.

२३. चित्रपटांना (भारतीय चित्रपटांच्या निर्मितीस व वितरणास उत्तेजन देणे आणि शैक्षणिक, शास्त्रीय व मनोरंजनात्मक चित्रपटांचे प्रदर्शन करणे आणि वापर करणे याखेरीज) परवाना देणे आणि करमणूक व मनोरंजनावर नियंत्रण ठेवणे (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ७१ पहा).

२४. राज्याच्या सुरक्षेच्या संबंधातील कारणांसाठी प्रतिबंधात्मक स्थानबद्धता करणे, सार्वजनिक सुव्यवस्था राखणे किंवा अशी स्थानबद्ध करण्यात आलेली जमात, व्यक्ती यांना आवश्यक असलेल्या सेवा व पुरवठा कायम ठेवणे यामध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव असेल—

(एक) राजद्रोहात्मक सभा अधिनियम व १९०८ चा फौजदारी कायदा, सुधारणा यांसह राज्याविरुद्धचे सर्व अपराध.

(दोन) राजकीय गुप्तवार्ता.

(तीन) राजकीय व जातीय आंदोलने व विघातक हालचाली आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय.

(चार) असाधारण घटना, आंतर-जातीय संबंध, दंगे, विक्षोभ (तसेच या सूचीतील नोंद क्रमांक १ पहा).

२५. नागरी संरक्षण, गृहरक्षक, ग्रामीण संरक्षण पथके व त्यासंबंधित बाबी.

२६. अभ्यवेक्षण –

(एक) डाक.

(दोन) तार.

(तीन) वृत्तपत्रे.

(चार) दूरध्वनी.

(पाच) ध्वनिक्षेपण.

(तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक २४ पहा).

२७. कटक मंडळाच्या अधिकारितेखालील क्षेत्रातील कोंडवाडे (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक १८ व ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक १५ पहा).

२८. परकीय देशांबरोबर परराष्ट्र व्यवहार, तह व करार करणे आणि परकीय देशांच्या प्रत्यार्पणासह झालेला तह, करार व अभिसंधीची अंमलबजावणी करणे.

२९. भारतात प्रवेश देणे आणि भारतातून स्थानांतर व निष्कासन करणे, भारतातील विदेशी धर्मप्रसारक, भारताबाहेरील तीर्थक्षेत्रांची तीर्थयात्रा (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक २ पहा).

३०. नागरिकत्व.

३१. संरक्षण, परराष्ट्र व्यवहार किंवा भारताची सुरक्षा यासंबंधित असलेल्या कारणांसाठी प्रतिबंधात्मक स्थानबद्धता किंवा अशा स्थानबद्धतेच्या अधीन असलेल्या व्यक्ती.

३२. पारपत्र व प्रवेशपत्र.

३३. विदेशी व्यक्तींचे प्रत्यार्पण.

३४. वयाचे, राष्ट्रीयत्त्वाचे व अधिवासाचे प्रमाणपत्र.

**दोन. तुरुंग विभाग**

३५. तुरुंग व त्यात स्थानबद्ध केलेल्या व्यक्ती, तुरुंगाचा वापर करण्यासाठी इतर राज्यांबरोबर तजवीज करणे, राज्याच्या सुरक्षेसंबंधातील कारणांसाठी प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेखालील व्यक्तींना हलविण्याखेरीज सैनिकी अपराध्यांना तडीपार करणे, सार्वजनिक सुव्यवस्था राखणे किंवा समाजाला आवश्यक सेवा व पुरवठा कायम ठेवणे.

३६. राज्याच्या सुरक्षेसंबंधातील कारणांसाठी प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेखाली असलेल्या व्यक्तींखेरीज कैद्यांना, आरोपींना एका राज्यातून दुसऱ्या राज्यात हलवणे, सार्वजनिक सुव्यवस्था राखणे किंवा समाजाला आवश्यक सेवा व पुरवठा कायम ठेवणे.

**तीन. राज्य उत्पादन शुल्क विभाग**

३७. अफू संबंधातील भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची एकमधील नोंद क्रमांक ५९ च्या अधीन येणाऱ्या बाबी म्हणजेच नशा आणणारे मद्य, औषधिद्रव्ये (धोकादायक औषधिद्रव्यांसह) आणि विषारी पदार्थ यांचे उत्पादन करणे, निर्मिती करणे, जवळ बाळगणे, वाहतूक करणे, खरेदी व विक्री करणे, दारुबंदीप्रचार व दारुबंदी शिक्षण वगळता नशा आणणाऱ्या मद्यांच्या वापरावर बंदी आणि उपभोगाच्या हेतूने वापरल्या जाणाऱ्या औषधिद्रव्यांवर बंदी घालणे (तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाखालील नोंद क्रमांक २१ आणि वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभागाखालील नोंद क्रमांक ५ पहा).

३८. राज्यात निर्माण किंवा उत्पादन झालेल्या पुढील वस्तूंवर उत्पादन शुल्क आकारणे आणि भारतात इतरत्र निर्माण किंवा उत्पादन झालेल्या त्याच वस्तूंवर त्याच दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने प्रतिशुल्क आकारणे.

(अ) मानवी उपभोगासाठी अल्कोहोलयुक्त मद्ये.

(ब) अल्कोहोलचा अंतर्भाव असलेली औषधी व प्रसाधनसामग्री.

(क) अफू, गांजा, भांग व इतर गुंगीकारक औषधिद्रव्ये आणि गुंगीकारक द्रव्ये.

३९. लागवड आणि निर्मिती किंवा निर्यातीसाठी विक्री यांचा संबंध पोचतो तेथवर अफू.

४०. भारतातील राज्यांबरोबर उत्पादन शुल्क करार करणे.

४१. काकवीचे नियंत्रण व वाटप करणे ( तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक २४ व सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाखालील नोंद क्रमांक ११ पहा ).

## चार. परिवहन विभाग

४२. यंत्रचलित वाहने यासह वाहने, मोटार वाहने व सार्वजनिक वाहने (सरकारी कोट्यातून देण्यात आलेल्या मोटार गाड्या, स्कूटर व इतर यंत्रचलित वाहने यांच्या बाबी वगळून) मार्ग परिवहन सेवा (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक २६ व गृह विभागाखालील नोंद क्रमांक १३ पहा).

४३. रस्त्यावर चालविण्यासाठी योग्य असलेल्या वाहनांवरील कर मग ती वाहने यंत्रचलित असोत किंवा नसोत ( तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक २६ पहा ).

४४. रस्त्यावरून नेण्यात येणारा माल व प्रवासी यांच्यावरील कर.

४५. टायर व ट्यूब यांचे वितरण करणे, मूल्य नियंत्रण व इतर बाबी.

४६. मोटार वाहने ( वितरण व विक्री ) नियंत्रण आदेश, १९५०, स्कूटर ( वितरण व विक्री ) नियंत्रण आदेश, १९६० व ट्रॅक्टर्स (वितरण व विक्री) नियंत्रण आदेश, १९७१.

४७. महाराष्ट्र मोटार वाहनांचे अधिग्रहण ( आणि नियंत्रण ) अधिनियम, १९६५.

४८. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.

४९. रेल्वे व तत्सम विषय ( नवीन रेल्वे प्रकल्प व रेल्वे स्टेशन नावांसह परंतु रेल्वेवरील व खालील पूल सोडून ).

५०. भारताच्या संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची एकमध्ये निर्दिष्ट करण्यात न आलेली दळणवळणाची इतर साधने, लहान रेल्वेमार्गासंबंधातील सूची एकमधील तरतुदींच्या अधीन असलेले असे लहान रेल्वेमार्ग, देशांतर्गत जलमार्ग व त्यावरील प्रशुल्क अशा जलमार्गासंबंधात भारताच्या संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची एक व तीनमधील तरतुदींच्या अधीन येणाऱ्या बाबी. (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक २१ व सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक १५ पहा).

५१. प्रमुख बंदरांशी संबंधित असलेल्या बाबी ( तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक ११ पहा ).

५२. संसदेने केलेल्या कायद्याखाली किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्याखाली

किंवा त्या अन्वये प्रमुख बंदरे असल्याचे घोषित करण्यात आले असतील त्याखेरीजची बंदरे.

५३. नौवहन व विमान यांच्या सुरक्षिततेसाठी दीपगृहे यासह प्रकाशनौका, संकेतदीप व इतर तरतुदी.

५४. अंतर्देशीय जलमार्गावर वाहतूक केलेल्या प्रवाशांची व मालाची येणे असलेली रक्कम.

५५. यंत्रावर चालणाऱ्या जहाजांच्या संबंधात देशांतर्गत जलमार्गावरील नौवहन आणि नौपरिवहन आणि राष्ट्रीय जलमार्गाच्या संबंधातील भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचित सूची एकमधील तरतुदींच्या अधीनतेने अशा जलमार्गावरील मार्गाचे नियम, देशांतर्गत जलमार्गावरील प्रवासी व माल यांची वाहतूक.

५६. भरतीच्या वेळी होणारी जलवाहतूक व नौकानयन यासह सागरी नौवहन व नौपरिवहन, व्यापारी जहाज वाहतुकीसाठी शिक्षण व प्रशिक्षण याची तरतूद व राज्य आंतरदेशीय बाष्प नौका अधिनियमाद्वारे उपबंधित केलेले असे शिक्षण व प्रशिक्षण यांचे विनियमन.

**पाच. सर्वसाधारण**

५७. गृह विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याच्या थकित रकमा निर्लेखित करणे.

५८. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनार्थ चौकशी व आकडेवारी.

५९. या सूचीतील कोणत्याही बाबीसंबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात आलेल्या फीचा समावेश नसलेली फी.

६०. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहीत असलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि गृह विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## ३. महसूल व वन विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. महसूल विभाग

१. महसूल प्रकरणातील अपील न्यायालये (तसेच विधि व न्याय विभागाखालील नोंद क्रमांक १२ आणि महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक १३ पहा).

२. नागरी जमीन धारणा (कमाल मर्यादा आणि अधिग्रहण) अधिनियम, १९७६ यान्वये नागरी जमीन धारणेच्या कमाल मर्यादेशी संबंधित सर्व बाबी वगळून इतर मालमत्तेचे संपादन करणे किंवा अधिग्रहण करणे, राज्याच्या प्रयोजनासाठी किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन केलेल्या किंवा अधिग्रहण केलेल्या मालमत्तेच्या संबंधात द्यावयाच्या भरपाईचे किंवा रकमेचे निर्धारण ज्यावर आधारलेले असते ते आधारतत्व आणि अशी भरपाई किंवा यथास्थिती रक्कम ज्या स्वरुपात आणि पद्धतीने द्यावयाची ते स्वरूप व पद्धती.

३. जमीन म्हणजेच जमिनीमधील किंवा तीवरील अधिकार, मालक व कूळ यांचे संबंध आणि खंड वसुली यांसह भू-धारणा; शेतजमिनींचे हस्तांतरण व अन्य संक्रमण, शेत जमिनीची कमाल मर्यादा, कृषी कर्जे, पाल्याधिकरणे, भारग्रस्त व संलग्न मालमत्ता निखात निधी.

४. तलावाखालील जमीन.

५. सरकारी तलावांतील मासेमारीचे अधिकार (तसेच कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाखालील नोंद क्रमांक २७ पहा)

६. महसूल आकारणी व महसूल वसुली, जमीन महसूल यांसह भू-अभिलेखांचे परीरक्षण, महसुली प्रयोजनासाठी सर्वेक्षण व हक्क नोंदणी, अभिलेख आणि महसुलाचे अन्य संक्रमण.

७. नागरी जमीन धारणा (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६ (१९७६ चा ३३) यात व्याख्या केल्याप्रमाणे, स्थानिक स्वयंशासित संस्थांनी वसूल केलेला कर वगळून जमीन व इमारती यांवरील कर आणि नागरी वसाहतीमधील जमिनी व इमारती यांवरील कर (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक १३ व ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक ९ पहा).

८. शेतजमिनीच्या उत्तराधिकारी संबंधातील शुल्क.

९. खनिज विकाससंबंधित कायद्याद्वारे संसदेने लादलेल्या कोणत्याही मर्यादेच्या

अधीनतेने खनिज अधिकारांवरील कर (तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक ४४ पहा).

१०. चैनीच्या वस्तूंवरील कर यांसह करमणूक, मनोरंजन, मटका व जुगार यांवरील कर आणि करमणूक शुल्काच्या दायित्वातून कोणत्याही करमणुकीस किंवा करमणुकींच्या प्रकारास सूट देणे.

११. मुद्रांक शुल्काच्या दरासंबंधात भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूचीच्या उपबंधात विनिर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांखेरीज इतर दस्तऐवजांसंबंधातील मुद्रांक शुल्काचे दर.

१२. शेत जमिनीखेरीज इतर मालमत्तेचे हस्तांतरण; विलेख व दस्तऐवज यांची नोंदणी.

१३. न्यायिक मुद्रांक माध्यमातून गोळा करण्यात आलेले शुल्क व फी यांखेरीज मुद्रांक शुल्क; परंतु यात मुद्रांक शुल्काचे दर व मुद्रांक याचा समावेश होणार नाही (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक १ व ३२ आणि विधि व न्याय विभागाखालील नोंद क्रमांक १२ पहा).

१४. नगरपालिका सीमेबाहेरील जमिनीचा विकास.

१५. राज्यांतर्गत प्रादेशिक बदल.

१६. मामलतदार न्यायालय अधिनियम.

१७. तंबाखूवरील शुल्क.

१८. दरडोई कर, व्यवसाय, व्यापार, आजीविका व सेवायोजन, पशु व बोटी यांवरील कर, वर्तमानपत्रातील जाहिरातींखेरीज इतर जाहिरातींवरील कर (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक ६ व ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक ७ पहा).

१९. वेठ बिगार (हातगाड्या ओढणे).

२०. राज्यांतर्गत बदलाखेरीज होणारे प्रादेशिक बदल.

२१. भारतीय सर्वेक्षण (तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाखालील नोंद क्रमांक ५ पहा).

२२. दुसऱ्या राज्यांबरोबरचा सीमावाद (महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद वगळून), (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ३९ पहा).

२३. मीठ.

२४. मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ व महाराष्ट्र राज्याच्या हैद्राबाद विदर्भ भागात अंमलात असलेले त्या संबंधातील तत्सम नियम यांचे प्रशासन.

२५. केंद्र शासनाच्या जमिनी (सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक ३ पहा).

२६. ट्राम गाड्यांवरील कर (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक ४३ पहा).

२७. नागरी जमीन धारणा (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६ (१९७६ चा ३३) यात व्याख्या केल्याप्रमाणे नागरी वसाहतीच्या सीमेबाहेर स्थित असलेल्या नागरी स्थावर मालमत्तेवरील कर (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक ७, नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक १३ आणि ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक ९ पहा).

२८. स्थावर मालमत्तेचे अधिग्रहण व संपादन अधिनियम, १९५२ याखाली जागा व इमारती यांची निवास व्यवस्था चालू ठेवणे व त्यांचे संपादन करणे.

२९. मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम, १९४८ खाली जमिनीचे अधिग्रहण करणे.

३०. पॉवर अल्कोहोल.

३१. धारण जमिनींचे एकत्रीकरण करणे.

३२. खंड व महसूल न्यायालये यामधील कार्यपध्दती (महसुली बाबींशी संबंधित अपील न्यायालयातील कार्यपध्दती खेरीज), (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक १ व विधि व न्याय विभागाखालील नोंद क्रमांक १२ पहा).

३३. शिक्षण उपकर.

## दोन. आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग

३४. अन्न टंचाई निवारण व अन्न टंचाई विरुद्ध प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.

३५. आग, पूर व इतर नैसर्गिक किंवा सर्वसाधारण आपत्तीमुळे होणाऱ्या हानीसाठी सहाय्य पुरविणे (तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक १४ पहा).

३६. संकटकालीन सहाय्य संघटना (तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक १४ पहा).

३७. आता बांगलादेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आधीच्या पूर्व पाकिस्तानातून स्थलांतरित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन व सहाय्य.

३८. पाटबंधारे प्रकल्प, जलविद्युत व बहुउद्देशीय प्रकल्प व पाणीपुरवठा प्रकल्प यामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन.

३९. पाकिस्तानातून विस्थापित झालेल्या व्यक्तींसाठी गृहनिर्माण योजना आखणे, वसाहती व वसतीस्थाने बसविणे व त्यांचे पुनर्वसन करणे.

४०. पाकिस्तानातून विस्थापित झालेल्या व्यक्तींसाठी काम व प्रशिक्षण सोयींची तरतूद करणे.

४१. निर्वासित हितसंबंध (विलगीकरण) प्रशासन अधिनियम, १९५१ आणि मुंबई आज्ञयार्थी अधिनियम, १९४८.

४२. विस्थापित व्यक्तींना भरपाई देण्यासंबंधातील बाबी व विस्थापित व्यक्ती (भरपाई व पुनर्वसन) अधिनियम, १९५४.

४३. नागरी कर्ज योजना व बर्मा निर्वासितांना आगाऊ रकमा.

**तीन. वन विभाग**

४४. वने. (सामाजिक वनीकरण वगळून).

४५. भारतीय वन सेवेच्या व्यवस्थापनासंबंधातील सर्व बाबी व त्यांच्या नियंत्रणाखालील पदे तसेच वन सेवेतील अधिकाऱ्यांच्या संबंधातील नियुक्त्या, बदल्या, बढत्या, प्रतिनियुक्त्या, रजा, शिस्तभंगाची कारवाई (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ४३ पहा).

४६. सामाजिक वनीकरणातील चारा व जळाऊ लाकूड यांसह गौण वन उत्पादनाच्या व्यापाराचे नियमन.

४७. राष्ट्रीय उपवने (तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक ७ पहा).

४८. वन्यपक्षी व वन्यप्राणी यांचे संरक्षण करणे.

**चार. सर्वसाधारण**

४९. विधि व न्याय विभागाखालील नोंद क्रमांक ५ मध्ये ज्यांची नोंद झाली. त्याखेरीज धार्मिक, इतर संस्था व संस्थापना (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक ४४ व ४६ पहा).

५०. अतिरिक्त सैनिकी कुटिरांची खरेदी करणे.

५१. मैदानी गोळीबार व तोफखाना सराव.

५२. महसूल व वन विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची थकबाकी निर्लेखित करणे.

५३. या अनुसूचीमधील कोणत्याही बाबींच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

५४. या अनुसूचीतील कोणत्याही बाबीसंबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न येणारी फी.

५५. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहीत असलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि महसूल व वन विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## ४. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. कृषी विभाग

१. शेती, यामध्ये कृषी विस्तार, कृषी अभियांत्रिकी, कृषी सांख्यिकी, कीड व रोगांपासून पिकांचे संरक्षण, कृषी संशोधन, प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील कृषी शिक्षणाव्यतिरिक्त इतर कृषी शिक्षण, दुग्धव्यवसाय व पशु सुधारणा यांसह पशुसंवर्धन, पशुवैद्यक, पशुवैद्यकीय शिक्षण, पशु रोगप्रतिबंध, कृषी वसाहतीकरण यांचा अंतर्भाव आहे (तसेच शालेय शिक्षण विभागाखालील नोंद क्रमांक १ पहा).

२. वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करणे.

३. प्राणी किंवा वनस्पती यांना बाधा पोहचविणाऱ्या संक्रमिक किंवा सांसर्गिक किटकजन्य रोगांचा एका घटकापासून दुसऱ्या घटकापर्यंत विस्तार होऊ नये यास प्रतिबंध (तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाखालील नोंद क्रमांक ४ पहा).

४. भारतीय वनस्पती सर्वेक्षण.

५. यांत्रिक मशागतीद्वारे जमिनीची सुधारणा करणे.

६. व्यापार योजना यासह खते व रासायनिक खते.

७. कृषी प्रयोजनांसाठी लोखंड, पोलाद व सिमेंट यांचा पुरवठा करणे (उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक २० व अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाखालील नोंद क्रमांक ६ पहा).

८. कृषी प्रयोजनांसाठी हलक्या डिझेल ऑईलचे वितरण करणे (उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक ३१ व अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाखालील नोंद क्रमांक ८ पहा).

९. ऊसाचा भाव निश्चित करणे.

१०. कृषी विद्यापीठे.

११. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी राज्याची एकूण गरज विचारात घेऊन कृषी शिक्षणासाठी पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी सम न्यायी व्यवस्था करण्यासंबंधीच्या सर्व बाबी.

**दोन. फलोत्पादन विभाग**

१२. फलोत्पादनाचा विकास, यामध्ये फलोत्पादन विस्तार, फलोत्पादन पिके, फलोत्पादन सांख्यिकी, फलोत्पादन संशोधन, प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षणाचा अंतर्भाव नसलेले शिक्षण, फलोत्पादन संपदा.

१३. फळ उत्पादनावर नियंत्रण.

**तीन. दुग्धविकास, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभाग**

१४. ग्रामीण भागातील दुधाचे उत्पादन व दुध संकलन संघटित करणे.

१५. दुग्धशाळा व प्रक्रिया युनिट यांना दुधपुरवठा करण्यासाठी दुध संकलन करणे, परिवहन करणे व इतर सर्व संलग्न कामे पार करणे.

१६. नागरी भागातील दुधावर प्रक्रिया करणे व वितरण करणे.

१७. दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करणे.

१८. बालान्न म्हणून दुध भुकटी तयार करणे.

१९. दुग्धशाळा विकासासंबंधातील सर्व बाबी.

२०. पशुसंवर्धन.

(एक) पशु विकास.

(दोन) शेळी व मेंढी विकास.

(तीन) सुकरालय विकास.

(चार) कुक्कुट विकास.

२१. पशु रोग-अन्वेषण व नियंत्रण.

२२. पशुवैद्यकीय सहाय्य.

२३. पशुखाद्य.

२४. कत्तल करण्यासाठी दिलेल्या प्राण्यांची योग्यता तपासणे व कत्तल केलेल्या प्राण्यांसंबंधीची व कत्तलखान्यासंबंधीची आकडेवारी ठेवणे (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक २० व ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक २ व १५ पहा).

२५. जनावरांस क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध.

२६. लोकर उत्पादन विश्लेषण व संशोधन.

२७. मत्स्य क्षेत्रे व मच्छिमार अधिकार (शासकीय तलावातील मच्छिमार अधिकारांखेरीज), (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक ५ पहा).

२८. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय यांमधील सहकारी संस्था (तसेच सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाखालील नोंद क्रमांक २० पहा).

**चार. सर्वसाधारण**

२९. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

३०. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

३१. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

३२. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा त्याच्या ताब्यात असलेली आणि कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## ५. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाला नेमून दिलेले विषय

**एक. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

१. पूर्व-प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षण (तसेच कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाखालील नोंद क्रमांक १ व उच्च व तंत्र शिक्षण विभागाखालील नोंद क्रमांक १ पहा).

२. प्रौढ साक्षरता.

३. १९८६ च्या शिक्षणावरील राष्ट्रीय धोरणाची अंमलबजावणी.

४. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण व त्या संबंधातील परीक्षा.

५. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ.

६. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.

७. महाराष्ट्र स्काऊट व गाईड संघटना.

८. राष्ट्रीय छात्र सेना.

९. बाल भवन.

१०. शिक्षक भवन.

११. राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद व त्याखालील सर्व कार्यशील संस्था.

१२. नवोदय विद्यालय.

१३. विद्या निकेतन.

१४. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना पुरस्कार देणे.

१५. राज्य शिक्षण तंत्रशास्त्र संस्था.

१६. या विभागाखालील नोंदीमध्ये समाविष्ट असलेल्या शिक्षणासंबंधातील प्रतिव्यक्ती (कॅपिटेशन) फी विषयीच्या बाबी.

१७. शासकीय परीक्षा केंद्र.

१८. पूर्व-प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण व प्रौढ साक्षरता कार्यक्रम राबविल्या जाणाऱ्या विभागांत कार्य करणारी दुय्यम कार्यालये व स्वायत्त संस्था.

१९. या विभागाखालील नोंदीद्वारे समाविष्ट केलेल्या शिक्षणासंबंधातील सवलतीविषयीच्या बाबी.

२०. क्रीडा, मनोरंजन व फुरसतीच्या वेळेचे कार्यक्रम.

२१. बिगर विद्यार्थी तरूण व प्रौढांसाठी शारीरिक शिक्षण व खेळ.

२२. खेळ, क्रीडा, मनोरंजन इ. यांच्या संघटनांचा विकास करणे.

२३. शारीरिक शिक्षण, क्रीडा, मनोरंजन व आरोग्य शिक्षण यासंबंधीचे प्रचालन, वाङ्‌मय व अशा सर्व कार्यातील संशोधनास उत्तेजन देणे.

२४. व्यायामशाळा, आखाडे, क्रीडा संघटना व क्रीडा क्लब याद्वारे करण्यात येणारे त्यांचे कार्य व त्या कार्याचे समन्वयन यांसह क्रीडा सल्लागार परिषद व तिचे कार्य आणि सहायक अनुदानाच्या रूपाने या संस्थांना उत्तेजन देणे.

२५. क्रीडा प्रेक्षागाराच्या व्यवस्थापनाची व बांधकामाची जबाबदारी.

२६. शिबिरे भ्रमण (हायकिंग), गिर्यारोहण, जलतरण यांना प्रोत्साहन देणे व क्रीडा महोत्सव भरविणे, क्रीडा संघटना, क्रीडा महोत्सव, खेळ-क्रीडा मनोरंजन यांचे आयोजन.

२७. ओव्हल मैदान, क्रॉस मैदान व आझाद मैदान यांसारख्या बृहन्मुंबईतील मैदानांचे व्यवस्थापन व प्रशासन.

२८. राष्ट्रीय क्रीडा निधी.

२९. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पातळीवर शारीरिक शिक्षण देणे.

३०. शिक्षकांना शारीरिक शिक्षण, क्रीडा व मनोरंजनविषयक प्रशिक्षण देणे.

३१. शारीरिक स्वास्थ्य कार्यक्रम व स्वास्थ चाचणी.

३२. कुस्ती.

३३. विद्यार्थ्यांसाठी खेळ.

३४. युवक सेवांसह युवक कल्याण.

**दोन. सर्वसाधारण**

३५. या विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

३६. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

३७. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

३८. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

३९. विभागाची संबंधित वृत्तपत्रे व पुस्तके यांच्या संबंधातील बाबी (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ६९, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक १८ आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाखालील नोंद क्रमांक २३ पहा).

## ६. नगरविकास विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. नगरविकास विभाग

१. स्थानिक शासन म्हणजेच नागरी क्षेत्रातील स्थानिक स्वयंशासनाच्या प्रयोजनासाठी महानगरपालिका, नगरपालिका, पौरनगरपालिका, छावण्या व अधिसूचित क्षेत्र समित्या, सुधार विश्वस्त मंडळे, खनिकर्म वसाहत प्राधिकरणे यांची स्थापना व अधिकार (नागरी भागातील अग्निशमन दल सेवा यासह).

२. भारताबाहेरील तीर्थक्षेत्राखेरीज इतर ठिकाणची तीर्थक्षेत्रे (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक २९ पहा).

३. नागरी भागातील दफन व दफनभूमी, प्रेतदहन व दफनभूमी (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ९ व ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक १४ पहा).

४. छावणी क्षेत्रातील स्थानिक स्वयंशासनाच्या भागातील व भारतामधील (भाडे नियंत्रणासह) निवास व्यवस्थेचे विनियमन करणे, छावणी क्षेत्रातील अग्निशमन सेवा यासह अशा भागांचे परिसीमन करणे (छावणीतील न्यायिक अधिकाऱ्यांच्या नियुक्तीखेरीज).

५. गृह विभागाखाली तरतूद केलेली आहे त्याखेरीज इतर पांथगृहे व पांथगृहपाल.

६. प्रतिव्यक्तीकर, व्यवसाय कर, व्यापार, आजीविका व सेवायोजन, पशु व बोटींवरील कर, वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध केलेल्या व त्यांनी स्थानिक नागरी प्राधिकरणाकडून जेवढा कर वसूल केला त्याव्यतिरिक्त जाहिरातींवरील वर्तमानपत्रांखेरीज मालाच्या खरेदी-विक्रीवरील कर (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक १८ व ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक ७ पहा).

७. उपयोग, वापर किंवा विक्री यासाठी स्थानिक नागरी विभागात आणलेल्या मालाच्या प्रवेशावरील उपकर (तसेच ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक ८ पहा).

८. शहर नियोजन योजना.

९. विनिर्दिष्ट केले असेल त्याप्रमाणे नवीन वसाहतींच्या नागरी वृद्ध केंद्राचे नियोजन व निष्पादन करणे आणि अशा केंद्राच्या विकासाचे काम सोपविलेली अभिकरणे.

१०. मुंबई महानगर प्रदेश विकास व तत्सम प्राधिकरणे.

११. न्हावा शेवा बंदराकरिता पायाभूत सवलतींच्या तरतुदीसंबंधातील व त्याच्या

विकासासंबंधातील बाबी (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक ५१ पहा).

१२. शहर नियोजन व मूल्यनिर्धारण विभाग.

१३. जमिनी व इमारती यांवरील कर (स्थानिक नागरी स्वयंशासन संस्थांद्वारे आकारणी करण्यात येत असेल तेव्हा), नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६ (१९७६ चा ३३) यामध्ये व्याख्या केलेल्या नागरी संकुलातील जमिनी व इमारती यावरील कर व अशा जमिनींच्या वापरकर्त्यातील बदलासाठी रुपांतरण अधिभाराची वसुली करणे (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक ७ व २७ आणि ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक ९ पहा).

१४. रेल्वे, समुद्र किंवा हवाई वाहतूक यांद्वारे केलेल्या मालांवरील किंवा प्रवाशांवरील सीमा कर, रेल्वे प्रवासभाडे व वाहतूक खर्च यांवरील कर (स्थानिक नागरिक समित्यांशी जेव्हा संबंधित आहे तेव्हा), (तसेच ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक १० पहा).

१५. नगरपालिका समित्या असणाऱ्या नागरी थंड हवेच्या ठिकाणांचे स्थानिक प्रशासन व तशा ठिकाणांवर अधीक्षकांच्या नियुक्त्या.

१६. ठाणे खाडीवरील पूल व मुंबई मार्ग विकास योजना यासंबंधातील बांधकामांखेरीज बृहन्मुंबईचा विकास व त्यात अंतर्भूत असलेले पुनःप्रापण प्रकल्प नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६ (१९७६ चा ३३) याअन्वये संपादन केलेल्या जमिनींचा विकास (तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक १२ पहा).

१७. नागरी जमीनधारणा (कमाल मर्यादा आणि नियमन) अधिनियम, १९७६ चा " जेथवर" इतर कोणत्याही विभागास नेमून दिलेल्या बाबींशी संबंध येतो त्याखेरीज (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक २ पहा).

१८. महानगरपालिका व नगरपालिका यांच्या अधिकारितेखालील क्षेत्रातील गुरांचे कोंडवाडे यांचा अंतर्भाव असलेले कोंडवाडे व गुरांचा प्रतिबंध (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक २७ व ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक १५ पहा).

१९. महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्या अधिकारितेखालील क्षेत्रांमध्ये जैव-वायुसयंत्रांच्या (बायोगॅस प्लॅन्ट) योजनांचे प्रशासन (तसेच ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक १६ पहा).

२०. नागरी क्षेत्रातील कत्तलखान्यांचे बांधकाम, परिक्षण व नियंत्रण (तसेच कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाखालील नोंद क्रमांक २४ व ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक २ पहा).

२१. नगरपालिका ट्राममार्ग (तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक १५ व गृह विभागाखालील नोंद क्रमांक ५० पहा).

२२. नागरी (नगरपालिका) सेवासंबंधातील, शहरांसाठी विशेष विकास कार्यक्रम.

२३. नगरपरिषदेच्या किंवा महानगरपालिकेच्या स्थानिक सीमांच्या आतील तीर्थयात्रेच्या स्थळांसाठी विशेष विकास कार्यक्रम.

२४. नागरी परिवहन (नागरी परिवहन प्रकल्पासह).

२५. नागरी भागामध्ये होणारी अनैसर्गिक लोकसंख्या वाढ.

**दोन. सर्वसाधारण**

२६. नगरविकास विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

२७. या सूचीतील कोणत्याही बाबींच्या प्रयोजनार्थ चौकशी व आकडेवारी.

२८. या सूचीतील कोणत्याही बाबींसंबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

२९. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि नगरविकास विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## ७. वित्त विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. वित्त विभाग

१. राज्याचा अर्थसंकल्प तयार करणे, अंदाज व अनुदाने, वित्त विधेयके, विनियोजन विधेयके आणि राज्यांच्या एकत्रित व आकस्मिक निधी संबंधातील कायदा.

२. विनियोजन अहवाल व वित्तलेखे.

३. स्वेच्छाधीन व पंचवार्षिक संविदा अनुदाने.

४. वित्तीय साधने.

५. कराधान केंद्र व राज्य स्थानिक स्वराज्य संस्थांनी आकारलेले कर वगळून.

६. सर्व प्रकारचे कर, करेतर महसूल आणि महसुलाच्या संकीर्ण बाबी यातील वाणिज्यिक महसुलाचे संनियंत्रण.

७. मुंबई ऊस उपकर अधिनियम, १९४८.

८. वृत्तपत्र जाहिरात कर.

९. केंद्र शासन उत्पादन शुल्क.

१०. (अ) विक्रीकर कायदे.
   (ब) ऊस उपकर/खरेदी कर.
   (क) कृषी आयकर.
   (ड) वित्त अधिनियम.

११. राज्य सार्वजनिक प्रतियुतीसंबंधातील सार्वजनिक ऋणाचा समावेश असलेले ऋण, ठेवींची गुंतवणूक.

१२. शेअर बाजार व वायदा बाजार.

१३. चलन, नाणी व वैध चलन (टांकसाळ).

१४. संघ शासनाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सीमाशुल्क सरहद्दीमधून आयात व निर्यात.

१५. भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची एकमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले त्या महामंडळाव्यतिरिक्त इतर महामंडळांचे विधिद्वारा संस्थापन; विनियमन व समापन करणे (तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक २६ पहा).

१६. राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे समन्वयन व पर्यवेक्षण करणे व त्यासाठी सुकाणू समिती स्थापन करणे.

१७. शासन निर्णित वित्त विभागास सोपविलेल्या सार्वजनिक उपक्रमांचे परिसमापन किंवा निर्गुंतवणूक.

१८. महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३).

१९. भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ व मुंबई व्यापारेतर निगम अधिनियम, १९५९ च्या प्रशासन खेरीज व्यापार व वाणिज्य (वित्तीय बाजू) व व्यापारी संघटना (तसेच विधि व न्याय विभागाखालील नोंद क्रमांक ६ पहा).

२०. बँक व्यवसाय.

२१. महानगरपालिकांना कर्जे.

२२. राज्याच्या वित्तव्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या कोणत्याही इतर बाबी.

२३. वेतन, भत्ते, निवृत्तिवेतने, सेवेच्या इतर वित्तीय शर्ती व संवर्ग संख्या (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ४२ च्या अधीनतेने).

२४. वित्तीय अधिकार प्रदान करणे.

२५. लेखा व कोषागार संचालनालय.

२६. उपायनगार-तोषाखाना.

२७. लेखापरीक्षा.

२८. अल्पबचत मोहीम.

२९. महाराष्ट्र वित्त आयोग.

३०. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी योजनेतर खर्चाच्या निधीचे, राज्याची एकूण गरज विचारात घेऊन समन्यायाने वाटप करण्यासंबंधीच्या सर्व बाबी.

३१. अतिरिक्त संवर्ग कक्ष.

**दोन. सर्वसाधारण**

३२. वित्त विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

३३. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनार्थ चौकशी व आकडेवारी.

३४. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

३५. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा त्याच्या ताब्यात असलेली व वित्त विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## ८. सार्वजनिक बांधकाम विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. सार्वजनिक बांधकाम विभाग

१. इतर कोणत्याही विभागाला नेमून दिले असतील त्याखेरीज, राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निश्चित केलेली व शासनाच्या ताब्यात असलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

२. २५९ सार्वजनिक बांधकामे या अन्वये राज्यपालांच्या निवासावरील सर्व बांधकाम खर्च, औद्योगिक व जमीन योजनांशी संबंधित बांधकामे.

३. संघ राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली (नौदल, सेवादल व वायुदल यांच्या बांधकामांसह) बांधकामे, जमिनी व इमारती (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक २५ पहा).

४. संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची एक मधील नोंद क्रमांक ६७ मध्ये अंतर्भूत असलेल्या ऐतिहासिक स्मारकांखेरीज ऐतिहासिक स्मारके (तसेच पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाखालील नोंद क्रमांक ३० व ३५ पहा).

५. (अ) रस्ते व इमारतीविषयक शीर्षे.

(ब) मुंबई विकास योजनाविषयक शीर्षे, याखालील अर्थसंकल्प व लेखे.

६. केंद्र शासनाचे अभिकरण म्हणून महाराष्ट्र शासनाकडे सोपविण्यात आले असतील त्याप्रमाणे अंशतः किंवा संपूर्णपणे केंद्रीय महसुलाकडे खर्ची घालण्याजोग्या अशा बांधकामांचे केंद्र शासनाच्यावतीने निष्पादन व परिरक्षण करणे आणि या कामांच्या संबंधात असलेले कोणतेही अर्थसंकल्प व लेखे ठेवणे.

७. उपवने व उद्याने (राष्ट्रीय उपवनांखेरीज), (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक ४७ पहा).

८. शासकीय इमारतीमध्ये वीज सामग्री बसवणे व परिरक्षण करणे (तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक ३५ पहा).

९. रेल्वेवरील पूल/भुयारी मार्ग यांसह रस्ते व पूल (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक ४९ पहा).

१०. उपनगरी प्रमुख मार्ग.

११. ठाणे खाडी पुलासंबंधातील बांधकामे.

१२. मुंबई मार्ग विकास योजना (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक १६ पहा).

१३. पथकर.

१४. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदतीसाठी रस्ते, इमारती इत्यादींसारखी साह्यकारी बांधकामे करणे (महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक ३५ व ३६ पहा).

१५. राजमार्ग (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक ५० व नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक २१ पहा).

**दोन. सर्वसाधारण**

१६. सार्वजनिक बांधकाम विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधी हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

१७. या अनुसूचीतील कोणत्याही बाबींच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

१८. या अनुसूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

१९. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## ९. जलसंपदा विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. पाटबंधारे

१. भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीमधील सूची एकच्या तरतुदींच्या अधीनतेने पाटबंधारे व कालवे तयार करणे व गटारे व बंधारे, जल साठवण व जल-ऊर्जा निर्माण करणे.

२. सिंचन प्रयोजनांसाठी नलिकाकूप तयार करणे.

३. उपसा सिंचन (६०० हेक्टरपर्यंतची लहान पाटबंधारे कामे वगळून).

४. पाटबंधारे, जलविद्युत व बहुउद्देशीय प्रकल्प योजना आखणे, अन्वेषण, सिद्धता व अंमलबजावणी करणे.

५. पाटबंधारे शीर्षाखालील अर्थसंकल्प व लेखे ठेवणे.

६. केंद्र शासनाचे अभिकरण म्हणून महाराष्ट्र शासनाकडे सोपवण्यात आले असतील त्याप्रमाणे केंद्रीय महसुलाकडे खर्ची घालण्याजोग्या बांधकामांचे केंद्र शासनाच्यावतीने निष्पादन व परिरक्षण करणे आणि जलसंपदा विभागाशी संबंधित आहे तेथवर कोणतीही बांधकामे असल्यास अशा कामांसंबंधित अर्थसंकल्प व लेखे ठेवणे.

७. पाणी वाटप व अधिसूचित केलेल्या जलसंधारणाचे नियंत्रण, जलसिंचन गटांना मंजुरी देणे, आगाऊ रकमा, पाणीपट्टी इत्यादीची वसुली करणे.

८. पाटबंधारे अधिनियमांची अंमलबजावणी करणे.

९. लाभक्षेत्र विकास प्राधिकरण.

१०. महाराष्ट्र पाटबंधारे विकास महामंडळ व तत्सम संस्था.

११. सुधार पट्टीची व्यवस्था करणे.

१२. प्रकल्पाखाली असणाऱ्या क्षेत्रांवरील जलसिंचन उपकराची वसुली करणे.

१३. पूरनियंत्रण कामे.

१४. पाटबंधारे व बहुउद्देशीय प्रकल्प व पूर नियंत्रण बांधकाम योजनेसाठी भारत सरकारकडून कर्जाची व्यवस्था करणे.

१५. पानथळ क्षेत्रांच्या सुधारणेसाठी जलनिस्सारण योजना तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे.

१६. अभियांत्रिकीमधील संशोधन.

१७. आंतर-राज्यीय नद्यांच्या पाण्याचा वाद.

१८. जलसिंचन व बहुउद्देशीय प्रकल्पांशी संबंधित हवाई व भूशास्त्रीय सर्वेक्षण करणे.

१९. हवामान शास्त्रविषयक संघटना व वेधशाळा.

२०. शासकीय मध्यवर्ती कर्मशाळा व भांडार, नागपूर.

२१. खार जमिनी.

२२. भूकंपशास्त्र.

**दोन. सर्वसाधारण**

२३. जलसंपदा विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याच्या थकबाकीची रक्कम निर्लेखित करणे.

२४. या अनुसूचीतील कोणत्याही विषयाच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

२५. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधातील, परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात आलेल्या फीचा अंतर्भाव नसलेली फी.

२६. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली व जलसंपदा विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

**तीन. जलसंपदा**

२७. जलसंपदेचे अनुमान.

## १०. विधि व न्याय विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. विधि व न्याय उप विभाग

१. राज्य विषय व समवर्ती विषय या संबंधीच्या राज्य विधानमंडळातील विधि विधानासंबंधातील मसुदा लेखन व इतर तांत्रिक बाबी (तसेच संसदीय कार्य विभागाखालील नोंद क्रमांक २ पहा).

२. दोषमुक्ती विरुद्ध अपील करणे व शिक्षा वाढविण्यासाठीचे अर्ज.

३. संस्था नोंदणी अधिनियम, साहित्यिक, वैज्ञानिक, धार्मिक व इतर संस्था व संघटना यांचे प्रशासन.

४. लेख प्रमाणक (नोटरी) अधिनियम, १९५२ ची अंमलबजावणी.

५. महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक ४९ मध्ये ज्यांचा अंतर्भाव आहे त्याखेरीज मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, धर्मादाय, धर्मादाय संस्था, धर्मादाय व धार्मिक दानविधि यांचे प्रशासन. (तसेच या सुचितील नोंद क्रमांक १९ पहा).

६. भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ व मुंबई व्यापारेतर निगम अधिनियम, १९५९ यांचे प्रशासन (तसेच वित्त विभागाखालील नोंद क्रमांक १९ पहा).

७. सरकारी अभियोक्त्यांच्या नियुक्त्या, पारिश्रमिक, इत्यादी.

८. ज्या खटल्यांमध्ये शासन एक पक्ष असतो असे दिवाणी न्यायालयीन खटले चालवणे व राज्य विधि अधिकारी, सरकारी अभियोक्ते व विशेष समुपदेशी यांच्या नियुक्त्या करणे व पारिश्रमिक देणे.

९. नाविक अधिकारिता.

१०. वाद व समन्स.

११. विधि व व्यवसाय.

१२. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय याखेरीज सर्व न्यायालयातील न्यायस्थापना व रचना उच्च न्यायालयाचे अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशासन, सर्वोच्च न्यायालय वगळता सर्व न्यायालयांतील न्यायालयीन फी वसूल करणे यामध्ये वसुली व विधि विधान यासंबंधीच्या तत्त्वांचा समावेश असेल परंतु यात न्यायालयीन फी संबंधातील कायद्याचे प्रशासन व अंमलबजावणी यांचा समावेश असणार नाही (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंदी क्रमांक १,१३ व ३२ पहा).

१३. महाराष्ट्र राज्य विधि सहाय्य व मार्गदर्शन योजना, १९७९.

१४. भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीमधील सूची एक किंवा दोन यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबीसंबंधीच्या कायद्याविरुद्धचे गुन्हे वगळता व नागरी अधिकाराच्या मदतीसाठी नौदल, सेनादल व वायूदल आणि इतर कोणतीही सशस्त्र दले यांचा वापर वगळता फौजदारी कायदा यांसह संविधानाच्या प्रारंभी भारतीय दंड संहितेमध्ये समाविष्ट केलेल्या सर्व बाबी.

१५. संविधानाच्या प्रारंभी दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये समाविष्ट केलेल्या सर्व बाबींसह दिवाणी प्रक्रिया.

१६. संविधानाच्या प्रारंभी दिवाणी प्रक्रिया संहितेमधील सर्व बाबींचा समावेश असलेली दिवाणी प्रक्रिया, जमीन महसुलाची थकबाकी आणि त्या राज्याबाहेरील वसुलीयोग्य रकमांसह कर व इतर सार्वजनिक मागण्यांच्या रकमा यांसह मागण्यांच्या राज्यातील वसुली.

१७. पुरावे व शपथ, विधि मान्यता, सार्वजनिक अधिनियम व अभिलेखन आणि न्यायिक कार्यवाही, प्रादेशिक विधि अहवाल.

१८. शेतीयोग्य जमीन, संयुक्त व विभक्त कुटुंब यांच्या बाबतीत असेल त्याखेरीज मृत्यूपत्रे, मृत्यूपत्ररहितता व उत्तराधिकार व्यक्तीगत कायद्यांच्या अधीनतेने संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी ज्या बाबींच्या संबंधात पक्ष न्यायिक कार्यवाहीत गुंतलेले होते अशा सर्व बाबी.

१९. महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक ४९ व विधि व न्याय विभागाखालील नोंद क्रमांक ५ यामध्ये अंतर्भूत असतील त्याखेरीजचे विश्वस्त व विश्वस्त संस्था.

२०. भागीदारी, अभिकरण, वाहणावळ संविदा व इतर विशेष प्रकारच्या संविदा यांचा अंतर्भाव असलेले परंतु शेतजमिनीशी संबंधित संविदांचा अंतर्भाव नसलेल्या संविदा.

२१. लवाद.

२२. दिवाळखोरी व नादारी.

२३. कारवाईयोग्य अपकृत्ये.

२४. सर्वोच्च न्यायालय वगळता इतर सर्व न्यायालयांची अधिकारिता व अधिकार.

२५. औद्यौगिक आणि कामगार न्यायालयाच्या शक्ती आणि कार्यक्षेत्रे.

२६. नादारी फिर्याद खर्च.

२७. महाप्रशासक व शासकीय विश्वस्त.

२८. विधि व न्याय विभागातील संकलनाचे पुनरीक्षण व अधिनियम, स्थानिक नियम व आदेश यांचे पुनर्मुद्रण.

**दोन. सर्वसाधारण**

२९. विधि व न्याय विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधात हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

३०. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

३१. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

३२. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली व शासनाच्या ताब्यात असलेली व विधि व न्याय विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## ११. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. उद्योग विभाग

१. नवशोध, पेटंट, संकल्पचित्रे, व्यापारचिन्हे व व्यापारी मालचिन्हे.

२. राज्यातील व्यापार व वाणिज्य आणि उत्पादन मालाचा पुरवठा व वितरण करणे आणि भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची तीन मधील तरतुदींच्या अधीनतेने ग्रामीण उद्योगांखेरीज इतर उद्योगातील उत्पादन.

३. व्यापार व वाणिज्य संबंधी राज्याचे सर्वसाधारण धोरण.

४. व्यापार व निर्यात विकास.

५. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापारी मेळे व प्रदर्शनांचे आयोजन आणि सहयोग.

६. हातमाग व हस्तकलेला उत्तेजन देणे व त्यासंबंधी प्रशिक्षण.

७. निर्यातीसाठी गोदामे, शीतगृहे, दळणवळण इत्यादी पायाभूत सोयी उभ्या करण्यास मदत.

८. निर्यात विकास क्षेत्र आणि तत्सम संस्था यांना निर्यातीसाठी सुविधा.

९. राज्यस्तरीय निर्यात विकास परिषद.

१०. व्यापार व वाणिज्य या संबंधी सर्व बाबींसाठी केंद्र शासनाशी संपर्क.

११. व्यापार व वाणिज्य यासाठी साधन सामग्रीचे संघटन.

१२. नियोजन विभागाच्या नोंद क्रमांक ६ व १५ व्यतिरिक्त विकास योजनांसाठी अपारंपारिक साधन सामग्रीचे संघटन.

१३. व्यापारी संस्थांना केंद्र शासनाकडून परवाने मिळण्यासाठी मदत करणे.

१४. केंद्र शासनाच्या व्यापार व वाणिज्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व विषयासंबंधात केंद्र व राज्य शासनामध्ये समन्वय.

१५. राज्याच्या सर्व विभागांसाठी निर्यात व्यवस्था करणे, जसे साखर, कापूस, हातमाग व हस्तकलेच्या वस्तू.

१६. आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासी आणि मालवाहतूक केंद्र व तद्नुषंगिक बाबी.

१७. भांडारे.

१८. शासकीय मुद्रणालये, लेखनसामग्री व शासकीय प्रकाशने ( तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ६९, शालेय शिक्षण विभागाखालील नोंद क्रमांक ३९

आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाखालील नोंद क्रमांक २३ पहा).

१९. गॅस व गॅससंबंधातील कामे [जैववायू (बायोगॅस) योजना वगळता], मुंबई गॅस पुरवठा अधिनियम, १९३० ची अंमलबजावणी करणे.

२०. औद्योगिक विकासाकरिता लोखंड, पोलाद व सिमेंट यांचा पुरवठा करणे (तसेच कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाखालील नोंद क्रमांक ७ व अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाखालील नोंद क्रमांक ६ पहा).

२१. औद्योगिक उपक्रमासाठी बांधकाम साहित्यावर आणि इमारती बांधकामावर नियंत्रण ठेवणे (तसेच अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाखालील नोंद क्रमांक ७ पहा).

२२. औद्योगिक वापरासाठी दगडी कोळसा, कोक (त्यापासून उत्पादित पदार्थांसह) यांचा पुरवठा व वितरण करणे आणि भारत शासनाचा अत्यावश्यक सेवा अधिनियम, १९५५ खाली त्यांच्यावर मूल्य नियंत्रण ठेवणे (तसेच अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाखालील नोंद क्रमांक ९ पहा).

२३. औद्योगिक प्रयोजनासाठी मिश्र अल्कोहोलची निर्मिती व वापर.

२४. साखर कारखान्यांची स्थापना (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक ४१ व सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाखालील नोंद क्रमांक ११ पहा).

२५. भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची एकमधील तरतुदींच्या अधीनतेने, पुढील उद्योग वगळता इतर सर्व उद्योगांसह कुटीर व ग्रामोद्योग –

(एक) औद्योगिक सहकारी संस्था म्हणजेच सहकारी तत्त्वावर आधारित संघटित उद्योग.

(दोन) हातमाग व यंत्रमाग उद्योग (तसेच सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाखालील नोंद क्रमांक १८ आणि ४१ पहा).

२६. बँक महामंडळे, आयुर्विमा महामंडळे, वित्तीय महामंडळे व संस्थापित न झालेल्या व्यापारी संस्था यांचा समावेश करून व्यापार महामंडळे वगळता इतर महामंडळांचे विधिद्वारा संस्थापन करणे, विनियमन करणे व समापन करणे (तसेच वित्त विभागाखालील नोंद क्रमांक १५ पहा).

२७. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ.

२८. मुख्यतः औद्योगिक प्रयोजनासाठी पाणीपुरवठा योजना (तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाखालील नोंद क्रमांक १ आणि ३ पहा).

२९. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ.

३०. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ.

३१. औद्योगिक प्रयोजनासाठी भट्टीतेलाचे (फर्नेस ऑईल) वितरण करणे (तसेच कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाखालील नोंद क्रमांक ८ आणि अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाखालील नोंद क्रमांक ८ पहा).

३२. सुशिक्षित बेरोजगारांसाठी बीज भांडवल योजना.

३३. खादी व ग्रामोद्योग मंडळ व प्रादेशिक विकास महामंडळ याखालील कृषी कार्यक्रम.

३४. खादी व ग्रामोद्योग मंडळ.

**दोन. ऊर्जा विभाग**

३५. वीज शुल्कासह वीज (शासकीय इमारतीमधील विद्युत संच मांडण्याची बांधणी व परिरक्षण वगळून), (तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक ८ पहा).

३६. भारतीय वीज अधिनियम, १९१०, वीज (पुरवठा) अधिनियम, १९४८, मुंबई उद्वाहन अधिनियम, १९३९, मुंबई वीज (विशेष शक्ती) अधिनियम, १९४८ यांचे प्रशासन.

३७. अंबरनाथ वीजपुरवठा.

३८. महाराष्ट्र राज्य वीज मंडळ.

३९. औष्णिक वीज केंद्राची बांधणी व औद्योगिक विजेची निर्मिती व वितरण करणे.

४०. जल विद्युत शक्तीची निर्मिती व वितरण.

४१. शासकीय विभागाच्या नियंत्रणाखाली ऊर्जा संधारण समन्वयन व कार्यक्रम.

४२. नवीन व नवकरणीय ऊर्जा.

**तीन. खाणकाम व भूशास्त्रीय सर्वेक्षण**

४३. भूशास्त्रीय सर्वेक्षण.

४४. केंद्र शासनाच्या नियंत्रणाखालील, संसदेने विधिद्वारे लोकहितास्तव इष्ट असल्याचे घोषित केलेले असतील अशा मर्यादेपर्यंतचे खाणकाम व खनिज विकासासंबंधीचे विनियमन.

४५. तेल क्षेत्रे (विनियमन व विकास) अधिनियम, १९४८ व पेट्रोलियम व नैसर्गिक वायू अधिनियम, १९५९ बाबतीत पेट्रोलियम व नैसर्गिक वायू संवर्धन व विकास यासंबंधातील समन्वेषण अनुज्ञप्तीच्या व खाणकाम भाडेपट्ट्याचे विनियमन करणे.

४६. (अ) भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय,

(ब) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर आणि

(क) मॅगनिज ओर (इंडिया) लिमिटेड यांच्या आस्थापना व प्रशासनाशी संबंधित सर्व प्रकरणे.

४७. पुढील अधिनियम व नियमासंबंधी सर्व बाबी -

(अ) प्रमुख खनिजाचे खनिपट्टे मंजुरी.

(ब) खनिज सवलत नियम, १९६०.

(क) खाण व खनिजे (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७.

(ड) कोळसा खाणी (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७३.

(इ) कोळशासंबंधी (संपादन व विकास) अधिनियम, १९५७.

(फ) कोळसा खाणी (संवर्धन व विकास) अधिनियम, १९७४.

(ग) खनिज (संवर्धन व विकास) नियम, १९५८.

**चार. कामगार विभाग**

४८. कामगारांची परिस्थिती, कामगारांचा भविष्यनिर्वाह निधी व सुखसोयी यांसह कामगार कल्याण.

४९. श्रमिक भरपाई, मालकांचे दायित्व, निःसमर्थता व वार्धक्य निवृत्ती वेतन.

५०. समेट अभिनिर्णय व लवाद, संप, टाळेबंदी यांसह औद्योगिक व कामगार वाद. (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ४८ पहा).

५१. कामगार संघटनांची नोंदणी.

५२. कारखाने.

५३. बॉयलर.

५४. वेतन प्रदान.

५५. प्रसूति लाभ.

५६. कामगार राज्य विमा (तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाखालील नोंद क्रमांक ८ पहा).

५७. औद्योगिक रोजगारांसाठी सामाजिक सुरक्षा व सामाजिक विमा स्थायी आदेश.

५८. दुकाने व वाणिज्यिक आस्थापनांमधील सेवेच्या शर्ती इत्यादी.

५९. औद्योगिक व कामगार न्यायालयाच्या शक्ती आणि कार्यक्षेत्रे.

**पाच. सर्वसाधारण**

६०. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

६१. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

६२. या अनुसूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

६३. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## १२. ग्रामविकास विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. ग्रामविकास विभाग

१. ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य म्हणजेच जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांची रचना, अधिकार, कामे व सेवा.

२. ग्रामीण भागातील कत्तलखान्यांचे बांधकाम, परिरक्षण व नियंत्रण. (तसेच कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाखालील नोंद क्रमांक २४, नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक २० तसेच या सुचीतील नोंद क्रमांक १५ पहा).

३. सामूहिक विकास कार्यक्रम.

४. स्थानिक विकास.

५. बहुउद्देशीय प्रकल्प व आदिवासी विकास गट.

६. राज्य परिवहन मार्ग विकास निधी. (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक ४२, ५० व ५२ पहा).

७. वृत्तपत्रांतील प्रसिद्ध केलेल्या जाहिराती व त्यांच्यावर ग्रामीण भागात जेवढा कर आकारलेला असेल त्याखेरीज जाहिरातीवर आधारित वृत्तपत्र वगळता मालाच्या खरेदी व विक्रीवरील कर, पशू व बोटींवरील कर, आजीविका व सेवायोजन, व्यापार, व्यवसाय कर, प्रतिव्यक्त कर वसूल करणे (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक १८ व नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक ६ पहा).

८. ग्रामीण स्थानिक क्षेत्रात वापर, विनिमय किंवा विक्रीसाठी बाहेरून आलेल्या मालावरील उपकर (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक ७ पहा).

९. जमिनी व इमारती यावरील कर (त्यांच्यावर ग्रामीण भागातील स्वयंशासित समित्यांद्वारे जेवढा कर आकारण्यात येत असेल तेवढा), (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक ७ आणि २७ व नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक १३ पहा).

१०. रेल्वे, समुद्र किंवा हवाई वाहतुकीद्वारे वाहून आणलेल्या मालावरील किंवा प्रवाशांवरील सीमाकर, रेल्वे प्रवास भाडे व वाहतूक यांवरील कर (स्थानिक नागरी समित्यांशी संबंधित असेल तितपत), (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक १४ पहा).

११. ग्रामविकास.

१२. ग्रामीण भागातील बेघर व भूमिहीन मजूर यांच्यासाठी घराकरिता जागेची आणि झोपड्यांच्या बांधकामाची तरतूद करण्याच्या योजना.

(अ) ग्रामीण क्षेत्रातील कामगार.

(ब) प्रधानमंत्री ग्रामोदय योजना.

(क) ग्रामीण गृहनिर्माणासाठी पत-नि-अर्थसहाय्य योजना. (तसेच गृहनिर्माण विभागाखालील नोंद क्रमांक ६ पहा).

(ड) इंदिरा आवास योजना.

१३. कोणत्याही ग्रामपंचायतीच्या स्थानिक मर्यादेत यात्रा स्थळासाठी विशेष विकास कार्यक्रम.

१४. ग्रामीण भागातील दफन व दफनभूमी आणि दहन व दहनभूमी (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ९ व नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक ३ पहा).

१५. महानगरपालिका व नगरपालिका यांच्या अधिकारितेखाली असलेल्या भागांतील कोंडवाड्यांखेरीज गुरांचे इतर ठिकाणांचे कोंडवाडे यांसह गुरांच्या अपप्रवेशावर बंदी घालणे व त्यांना कोंडवाड्यात डांबणे (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक २७ व नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक १८ पहा).

१६. ग्रामीण भागातील जैव-वायू संयंत्र योजनेचे प्रशासन (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक १९ पहा).

१७. एकात्मिकृत ग्रामीण विकास कार्यक्रम यांसारख्या अभिकरणांनी चालवलेली जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणे व योजना. (जवाहर रोजगार योजना वगळून) आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम.

१८. ग्रामीण दूरध्वनी यंत्रणा. (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक २४ व गृह विभागाखालील नोंद क्रमांक २६ पहा).

१९. राष्ट्रीय समविकास योजना (आरएसव्हीवाय)/मागासभागासाठी अनुदान निधी योजना (बीआरजीएफ).

## दोन. सर्वसाधारण

२०. ग्रामविकास विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

२१. या सूचीमधील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

२२. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

२३. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि ग्रामविकास विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## १३. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला नेमून दिलेले विषय

**एक. अन्न**

१. जिल्ह्यांना अन्न पुरवठा करणे, अन्नधान्यांच्या किंमती व आधार किंमती.

२. बृहन्मुंबईचे अन्न प्रशासन.

३. अन्न लाभांश निधीचे प्रशासन यासह धान्य प्रापण बक्षीस योजना.

**दोन. नागरी पुरवठा**

४. मुंबई अत्यावश्यक वस्तू व पशू (नियंत्रण करणे) अधिनियम, १९५८.

५. अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा दहा) च्या अर्थांतर्गत असलेल्या सर्व अत्यावश्यक वस्तूंचे रास्त किंमतीच्या दुकानांमार्फत वितरण करणे यासह त्यांच्या किंमतीचे स्वेच्छा व सांविधिक विनियमन करणे (तसेच सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाखालील नोंद क्रमांक ५५ पहा).

६. कृषी प्रयोजने आणि औद्योगिक विकास यासाठी होणाऱ्या पुरवठ्याखेरीज लोखंड, पोलाद व सिमेंट यांचा पुरवठा व वितरण करणे (तसेच कृषी, पशु संवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाखालील नोंद क्रमांक ७ व उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक २० पहा).

७. मुंबई इमारत (उभारणी, पुनर्उभारणी व रुपांतरण करणे) अधिनियम, १९४८ चा थिएटर, सिनेमा व सार्वजनिक मनोरंजनाची इतर ठिकाणे यांच्या प्रयोजनांसाठी असलेल्या इमारतींशी जेथवर संबंध येतो तेथवर (तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक २१ पहा).

८. अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा दहा) खाली ज्यांच्याशी इतर कोणत्याही विभागाच्या व त्यांच्या मूल्य नियंत्रणाचा अनन्य संबंध येत नाही, अशा मोटार स्पिरीट, हाय स्पीड ऑईल, लाईट स्पीड ऑईल, भट्टी ऑईल, केरोसीन इत्यादींसारख्या सर्व पेट्रोलियम पदार्थांचे वितरण करणे (तसेच कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाखालील नोंद क्रमांक ८ व उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक ३१ पहा).

९. अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ खाली कोळसा, कोक यांचा औद्योगिक वापर व त्यांचे मूल्यनियंत्रण यांखेरीज कोळसा, कोकचे वितरण करणे (तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक २२ पहा).

१०. मुंबई शहर आणि जिल्ह्यांमधील नागरी पुरवठा कर्मचारीवर्गाशी संबंधीत असलेल्या आस्थापनेच्या बाबी, शिधावाटप नियंत्रक व अन्न नियंत्रक, मुंबई संघटना यासंबंधीच्या कामांसह पूर्वीच्या नागरी पुरवठा विभागाशी संबंधित असलेले उर्वरित काम पाहणे.

११. शिधावाटप नियंत्रक व अन्न नियंत्रक, मुंबई यांच्या संघटनेशी जे संबंधित आहेत त्यासहित पूर्वीच्या नागरी पुरवठा विभागाशी संबंधित असलेले विषय—

(एक) नागरी पुरवठा व्यवहार, ठेवीचे परतावे इत्यादी संबंधातील शिल्लक असलेल्या दाव्यांबाबत समझोता करणे.

(दोन) अन्नधान्य व इतर वस्तू आणि विभागाने हाताळलेल्या भांडार वस्तू यांमध्ये झालेली हानी निर्लेखित करणे.

(तीन) गोदाम-इमारती, अधिग्रहण केलेल्या जागेतील गोदामाची साधनसामग्री, जड वस्तू यांची विल्हेवाट लावणे व जड वस्तूंची पडताळणी करणे.

(चार) नागरी पुरवठाव्यवहारांमुळे निर्माण होणारे प्रलंबित न्यायालयीन वाद.

१२. भात गिरणी उद्योग (विनियमन) अधिनियम, १९५८ व त्याखालील नियम.

१३. मुंबई पिठाच्या गिरण्या व चक्की अनुज्ञप्ती आदेश यासंबंधातील उर्वरित काम पाहणे.

१४. राज्य सरकारी क्षेत्रात बेकऱ्या सुरु करणे आणि त्यासंबंधित सहाय्यभूत बाबी.

१५. रेल्वे मंडळाने निर्गमित केलेल्या सर्वसाधारण आदेशाखाली शासनाच्यावतीने मालाची/सामानाची ने-आण किंवा वाहतूक करणे.

१६. वजने व मापे.

**तीन. ग्राहक संरक्षण**

१७. ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६.

१८. ग्राहक संरक्षण कामासाठी केंद्र सरकारकडून स्वीकारलेल्या अनुदानाचा वापर करणे.

१९. ग्राहक शिक्षण व संशोधन.

२०. ग्राहक संरक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना व व्यक्तींना सहाय्य करणे व नवीन ग्राहक संरक्षण संघटना स्थापन करण्यासाठी उत्तेजन देणे.

२१. ग्राहक संरक्षण व मार्गदर्शन निधी.

२२. ग्राहक संरक्षण संबंधातील इतर कोणत्याही बाबी.

**चार. सर्वसाधारण**

२३. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

२४. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

२५. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधात परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

२६. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहीत केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## १४. नियोजन विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. नियोजन विभाग

१. सामाजिक-आर्थिक नियोजनासंबंधीची तत्वेचे व धोरणे याविषयीच्या सर्व बाबी.

२. नियोजन आयोगाशी संबंधित असलेला सर्व पत्रव्यवहार पाहणे व अन्य व्यवहार पाहणे.

३. जिल्हा व राज्य यांच्यासाठी योजना तयार करणे (आदिवासी उपयोजनांखेरीज जिल्ह्याच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे व त्यांचा वेळोवेळी आढावा घेणे), (तसेच आदिवासी विकास विभागाखालील नोंद क्रमांक २ पहा).

४. योजनांतर्गत योजनांचा विकास कार्यक्रम व नियतकालिक प्रगती अहवाल ठेवणे.

५. केंद्र पुरस्कृत व केंद्रीय योजना.

६. राज्य योजना व केंद्र पुरस्कृत केंद्रीय योजना या दोहोंसाठी केंद्रीय सहाय्य.

७. कार्यान्वयनाखालील कार्यक्रमाचे मूल्यमापन करणे.

८. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाखालील प्रकल्पांचा समावेश असलेल्या प्रकल्पाची आखणी, प्रकल्प मान्यता आणि प्रकल्प मूल्यमापन करणे.

९. विदेशी तंत्र सहाय्य.

१०. सर्व विकास कार्यक्रमाचा समन्वय करणे.

११. राज्य नियोजन मंडळासाठी राष्ट्रीय विकास परिषदेच्या कक्षेत अंतर्भूत असलेल्या किंवा जिल्हा नियोजन मंडळाशी संबंधित असलेल्या सर्व बाबी.

१२. २०-कलमी कार्यक्रमाच्या कार्यान्वयनात समन्वय साधणे.

१३. रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करणे.

१४. विकास कार्यक्रमासाठी संस्थात्मक वित्त व्यवस्था करणे.

१५. राज्य नियोजन मंडळासाठी सचिवीय सहाय्याची तरतूद करणे.

१६. अर्थ व सांख्यिकी केंद्र संचालनालय.

१७. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या विकास मंडळाच्या आस्थापना व प्रशासनविषयक सर्व बाबी.

१८. राज्याची एकूण गरज विचारात घेऊन विकास मंडळाच्या क्षेत्रावरील योजनांच्या विकास खर्चासाठी निधीचे समन्यायाने वाटप करण्यासंबंधीच्या सर्व बाबी.

**दोन. सर्वसाधारण**

१९. नियोजन विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

२०. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

२१. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधातील, परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

२२. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि नियोजन विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## १५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. सामाजिक न्याय विभाग

१. मागासवर्गासाठी प्रशासकीय यंत्रणा (अनुसूचित जमातीखेरीज) व सामाजिक न्याय.

२. मागासवर्ग सहकारी गृहनिर्माण योजना.

३. अनुसूचित जाती यांच्या कल्याणासंबंधीच्या योजनेत समन्वय साधणे.

४. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या अल्पसंख्यांक वर्गातील जाती-जमातींच्या आर्थिक उन्नतीच्या योजना.

५. मागासवर्गीय मंडळ.

६. अस्पृश्यता (अपराध) अधिनियम, १९५५ ची अंमलबजावणी करणे.

७. मुंबईची हिंदूंच्या सार्वजनिक पूजे-अर्चेची ठिकाणे (प्रवेश अधिकृत करणे) अधिनियम, १९५६ चे प्रशासन करणे.

८. संविधानाचा अनुच्छेद २७५ (१) खालील अनुदान व केंद्र शासनाने मागास-वर्गासाठी मंजूर केलेली इतर अनुदाने.

९. अनुसूचित जमातींची वसतीगृहे वगळता मागासवर्गीयांची वसतीगृहे.

१०. अनुसूचित जातींसाठीच्या निवासी शाळा व आश्रमशाळांशी संबंधित असलेल्या सर्व बाबी.

११. वृद्ध व अपंग व्यक्तींकरिता गृहे व अपंगालये उभारणे.

१२. सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणासह सामाजिक कार्यासाठी प्रशिक्षण व त्यातील संशोधन.

१३. सामाजिक कार्याचे समन्वयन करणे.

१४. कार्यगृहे, मुक्ती सेनागृह (सुधारगृह).

१५. आंधळ्या, बहिऱ्या, मुक्या व मतिमंद व्यक्तींबाबतच्या समस्या.

१६. भारत सेवक समाज.

१७. ज्या व्यक्तींना गुंगीकरण द्रव्ये व मानसिक स्थिती बिघडवणाऱ्या पदार्थांचे व्यसन जडलेले आहे अशा व्यक्तींचा उपचार, पुनर्वसन व त्यांच्या व्यसनावर प्रतिबंध घालण्यासाठी सर्व शासकीय व अशासकीय विभागांचे समन्वयन करणे.

१८. संजय गांधी निराधार अनुदान योजना.

१९. संजय गांधी स्वावलंबन योजना.

२०. विशेष करुन जे इतर कोणत्याही विभागाला नेमून दिलेले नाही असे समाज-कल्याणाशी संबंधित असलेले संपूर्ण काम.

**दोन. दारुबंदी प्रचार कार्य उप विभाग**

२१. दारुबंदी प्रचार कार्य व दारुबंदी शिक्षण.

**तीन. व्यसनमुक्ती कार्य उप विभाग**

२२. व्यसनमुक्ती प्रचार शिक्षण.

**चार. सर्वसाधारण**

२३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकुमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

२४. या अनुसूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

२५. या अनुसूचीतील कोणत्याही बाबीसंबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

२६. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## १६. संसदीय कार्य विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. संसदीय कार्य विभाग

१. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन बोलविण्याची व सत्र समाप्तीची तारीख ठरविणे, विधानसभा विसर्जित करणे, विधानमंडळाच्या संयुक्त अधिवेशनासाठी राज्यपालांचे अभिभाषण तयार करणे.

२. शासकीय विधेयकांची अधिनियमितता व विधेयक सभागृहापुढे सादर करणे व कोणतेही विधि विधान मंजूर करणे यांच्या संबंधातील बाबी (तसेच विधि व न्याय विभागाखालील नोंद क्रमांक १ पहा).

३. दोन्ही सभागृहातील वैधानिक व अन्य कार्यालयीन कामकाज यांचे नियोजन व समन्वयन.

४. राज्य विधानमंडळाच्या सदस्यांद्वारे ज्या प्रस्तावांसंबंधीची नोटीस दिलेली असते त्यांच्या चर्चेसाठी विधानमंडळामध्ये शासकीय वेळ नेमून देणे.

५. गटनेते व विरोधी पक्षांच्या प्रतोदांशी संपर्क ठेवणे.

६. विधेयकावरील निवड समित्या व संयुक्त समित्या यांकरिता सदस्यांच्या सूच्या तयार करणे.

७. शासनाने स्थापन केलेल्या समित्यांवर व संस्थांवर विधानमंडळातील सदस्यांच्या नेमणुका करणे.

८. राज्य शासनाच्या मालकीची किंवा नियंत्रणाखालील मंडळे, महामंडळे किंवा शासनाने नियुक्त केलेल्या समित्यांवरील अध्यक्ष/अशासकिय सदस्य यांना कार्यालयीन व निवासी जागेचे वाटप, भत्ते, सुविधा किंवा इतर मागण्या आणि प्रशिक्षण याबाबतच्या सर्व बाबींवर पर्यवेक्षणांचे अधिकार (तसेच वित्त विभागाखालील नोंद क्रमांक १६ पहा).

९. सचिवालयाच्या विभिन्न विभागांसाठी राज्य विधानमंडळातील सदस्यांच्या विचारविमर्श समित्यांचे कार्य.

१०. दोन्ही सभागृहांमध्ये मंत्रिमहोदयांनी दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी.

११. खाजगी सदस्यांचे विधेयक व निर्णय याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट करणे.

१२. मंत्रिमंडळ समितीला संसदीय कार्याबाबत सचिवालयीन सहाय्य देणे.

(एक) समित्यांच्या सभा बोलावणे.

(दोन) कार्यसूचीची कागदपत्रे फिरविणे, इत्यादी.

१३. राज्य विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते.

१४. राज्य विधानमंडळाच्या पीठासीन अधिकाऱ्यांचे वेतन व भत्ते.

१५. कार्यपद्धती विषयक व इतर संसदीय बाबींसंबंधी सचिवालयीन विभागांना सल्ला देणे.

१६. "राज्य विधानमंडळाच्या समित्यांद्वारे" करण्यात आलेल्या शिफारशींवर सचिवालयीन विभागांनी केलेल्या कार्यवाहीचे समन्वयन करणे.

१७. राज्य विधानमंडळाच्या सदस्यांच्या आवडीच्या ठिकाणी शासनाने पुरस्कृत केलेल्या भेटी.

१८. राज्य विधानमंडळ सदस्यांचे अधिकार, हक्क व उन्मुक्तता यासंबंधित असलेल्या बाबी.

१९. अविश्वास ठराव, निर्णय इत्यादींसारख्या एकापेक्षा अधिक विभागांशी संबंधित असलेल्या संसदीय बाबी.

२०. संसद सदस्यांच्या मुख्यमंत्र्यांबरोबर नियतकालिक बैठकी.

२१. मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री व मंत्र्यांचे संसदीय सचिव यांचे वेतन व भत्ते.

२२. अशासकीय विधेयके व त्यांतील सुधारणा याकरिता राज्यपालांची शिफारस मिळविणे.

२३. विधानमंडळाच्या प्रत्येक सत्राचा वैधानिक व इतर कार्यक्रम तयार करणे. (अर्थसंकल्प व पुरवणी अर्थसंकल्प सादर करणे यासंबंधीच्या व त्यावरील चर्चेच्या तारखा निश्चित करण्यासह).

२४. राज्य विधानमंडळाच्या सदस्यत्त्वासाठी अनर्हता निरसित करणे.

२५. राज्य विधानमंडळाची कार्य नियमावली तयार करणे.

२६. लोकसभा व राज्यसभा यांच्या सचिवालयाकडील व इतर राज्यांच्या विधानमंडळांच्या सचिवालयाकडील पत्रव्यवहार.

२७. राज्य विधानमंडळाशी संबंधित असलेल्या बाबी.

२८. संसदेशी संबंधित असलेल्या बाबी.

२९. संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळातील वैधानिक कार्यासंबंधी व्यक्तीगत खाजगी संस्थांकडील पत्रव्यवहार.

## दोन. सर्वसाधारण

३०. संसदीय कार्य विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

३१. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

३२. या सूचीतील कोणत्याही बाबी संबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

३३. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि संसदीय कार्य विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## १७. गृहनिर्माण विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. गृहनिर्माण विभाग

१. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, १९७६.

२. महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ मर्यादित.

३. नागरी गृहनिर्माण योजना, मध्यम व अल्प-उत्पन्न गट गृहनिर्माण, औद्योगिक गृहनिर्माण योजनांसाठी नागरी स्थानिक संस्था व छावण्या यांना सहाय्य मंजूर करणे व बी.डी.डी. चाळीचे व्यवस्थापन.

४. औद्योगिक कामगार व कर्मचारी यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांशी जेथवर संबंध येतो तेथवर अर्थसहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजना.

५. बिगर आदिवासी भागामध्ये कौलांद्वारे झोपड्या व गवती छपरांऐवजी कौलारू छपरे घालण्याच्या योजना व ग्रामीण गृहनिर्माण योजना.

६. दुर्बल घटकांसाठी गृहनिर्माण योजना (तसेच ग्रामविकास विभागाखालील नोंद क्रमांक १२ पहा).

७. गलिच्छ वस्ती सुधार योजना, अतिक्रमण हटविणे व त्यावर सुविधांची तरतूद करणे.

८. धारावी विकास योजनेचे व्यवस्थापन.

९. बृहन्मुंबईमधील जुन्या इमारतींची दुरुस्ती करणे व मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्रचना करणे.

१०. पूर्वरचित साहित्य यांसह बांधकाम साहित्य कारखाने स्थापन करणे.

११. शासकीय जागांतून निष्कासन करण्याबाबतचा अधिनियम.

१२. भाडे अधिनियम.

१३. रिकाम्या जमिनींच्या अनधिकृत ताब्याशी संबंधित सर्व बाबी.

१४. महाराष्ट्र गलिच्छ वस्ती (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१.

१५. महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) अधिनियम, १९६३.

१६. महाराष्ट्र सदनिका मालकी अधिनियम, १९७०.

### दोन. सर्वसाधारण

१७. गृहनिर्माण विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधात हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

१८. या सूचीतील कोणत्याही बाबींच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी ठेवणे.

१९. या सूचीतील या कोणत्याही बाबीसंबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

२०. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि गृहनिर्माण विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## १८. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. पाणीपुरवठा व स्वच्छता उप विभाग

१. सरकारी जलशाळा व नगरपालिका पाणीपुरवठा व जलनिस्सारण व नागरी विभागातील इतर स्वच्छता पाणीपुरवठा योजनांसाठी भारत सरकारने दिलेल्या कर्जाची व्यवस्था (तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक २८ पहा).

२. पाणीपुरवठा व जलनिस्सारणाचे प्रकल्प शासनाने तयार करणे आवश्यक असेल, तेव्हा असे प्रकल्प तयार करणे, हे कार्यान्वित करणे व त्यांचे प्रवर्तन.

३. माणसे व गुरे यांच्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता योजना (यात जलसिंचनासाठी असलेल्या पाणीपुरवठ्याचा समावेश होत नाही).

४. भूजल सर्वेक्षण आणि विकास अभिकरण.

५. राज्यातील भूजलाच्या पातळीचे सर्वेक्षण आणि तद्नुषंगिक सर्व बाबी.

६. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण भागात तात्पुरत्या उपाय योजना करणे.

७. उपसा नियंत्रण व भूजल वापराचे नियंत्रण व त्या अनुषंगाने केलेल्या महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम, १९९३ व त्याखालील नियमांची अंमलबजावणी करणे.

८. पाण्याची काटकसर करण्याकरिता पाण्याच्या संपरिक्षेच्या संदर्भात कार्यवाही करणे.

९. जलसंपत्ती विकास प्राधिकरण.

### दोन. सर्वसाधारण

१०. पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाच्या कक्षेतील कोणत्याही बाबीसंबंधी हुकूमनाम्यान्वये येणे असलेल्या रकमा निर्लेखित करणे.

११. या सूचीतील कोणत्याही बाबींच्या प्रयोजनार्थ चौकशी व आकडेवारी.

१२. कोणत्याही न्यायालयात घेण्यात येणारी फी वगळून या सूचीतील कोणत्याही बाबींच्या संबंधातील फी.

१३. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली व या विभागाकडे अभिहस्तांकित केलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## १९. सार्वजनिक आरोग्य विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग

१. सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, अशैक्षणिक रुग्णालये व दवाखाने, जन्म, मृत्यू व विवाह यांची नोंद करणे. (तसेच महिला व बालविकास विभागाखालील नोंद क्रमांक १४ पहा).

२. कुटुंब कल्याण कार्यक्रम.

३. वेड्या व मानसिकदृष्ट्या कमकुवत व्यक्तींना (गुन्हेगार वेड्याखेरीज) दाखल करुन घेणे व त्यांच्यावर उपचार करणे यासाठीच्या जागांच्या अंतर्भावासह, विकलांग व रोजगार करु न शकणाऱ्या वेडसर मानसिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या व्यक्तींना सहाय्य (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक १० पहा).

४. पुरुषांना बाधक असलेल्या संक्रामक व सांसर्गिक रोग एका युनिटातून दुसऱ्या युनिटामध्ये पसरण्यास प्रतिबंध करणे (तसेच कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाखालील नोंद क्रमांक ३ पहा).

५. बंदर संसर्गरोधशाळा, सागरी व नाविक रुग्णालये व बंदर संसर्गरोधशाळेशी संबंधित असलेली रुग्णालये.

६. मुंबई शुश्रूषा गृह नोंदणी अधिनियम, १९४९.

७. सहकारी रुग्णालयांसाठी भाग-भांडवली अंशदान.

८. राज्य कामगार विमा योजना (वैद्यकीय सुविधा), (तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक ५६ पहा).

९. कुष्ठरोगापासून मुक्त झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन करणे.

### दोन. सर्वसाधारण

१०. सार्वजनिक आरोग्य विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

११. या सूचीतील कोणत्याही बाबींच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी ठेवणे.

१२. या सूचीतील कोणत्याही बाबीसंबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

१३. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि सार्वजनिक आरोग्य विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## २०. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग

१. वैद्यकीय शिक्षण, शैक्षणिक रुग्णालये व दवाखाने.

२. वैद्यकीय शुश्रूषा, औषधनिर्माण शास्त्र व दंतविषयक व्यवसाय.

३. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी राज्याची एकूण गरज विचारात घेवून वैद्यकीय शिक्षणासाठी पर्याप्त सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी समन्यायी व्यवस्था करण्यासंबंधीच्या सर्व बाबी.

### दोन. औषधिद्रव्ये विभाग

४. अन्नपदार्थ व इतर वस्तू यांतील भेसळ.

५. विष अधिनियम, १९१९ (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक ३७ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाखालील नोंद क्रमांक २१ पहा).

६. औषधिद्रव्ये नियंत्रण प्रशासन संचालनालय, औषधिद्रव्ये व सौंदर्य प्रसाधन अधिनियम, १९४०; औषधिद्रव्ये व मांत्रिक उपचार (आक्षेपार्ह जाहिराती) अधिनियम, १९५४; औषधिनिर्माण अधिनियम, १९४८; औषधिद्रव्ये (नियंत्रण) अधिनियम, १९५०.

### तीन. सर्वसाधारण

७. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

८. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी ठेवणे.

९. या सूचीतील कोणत्याही बाबीसंबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

१०. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

# २१. आदिवासी विकास विभागाला नेमून दिलेले विषय

## एक. आदिवासी विकास विभाग

१. आदिवासी विकास विभागाकरिता प्रशासकीय यंत्रणा.

२. नियोजन विभागाशी विचारविनिमय करुन योजना वाटपांतर्गत राज्य व जिल्हे यांच्याकरिता आदिवासी उपयोजना तयार करणे, योजनांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे व वेळोवेळी त्यांचा आढावा घेणे (तसेच नियोजन विभागाखालील नोंद क्रमांक ३ पहा).

३. राज्यातील अनुसूचित क्षेत्रांच्या प्रशासनावरील राज्यपालांच्या वार्षिक अहवालासंबंधी कामाचे समन्वयन करणे.

४. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (एक) खाली आणि त्यात नमूद केलेल्या प्रयोजनासाठी भारत सरकारकडून मिळालेल्या सहायक अनुदानाचा व विशेष केंद्रीय सहाय्याचा विनियोग करणे.

५. आदिवासी सल्लागार परिषद.

६. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था.

७. अनुसूचित जमातींकरिता असलेल्या शासकीय व अनुदानप्राप्त आश्रमशाळा यासंबंधित सर्व बाबी.

८. अनुसूचित जमातींची मुले व मुली यांच्यासाठी वसतिगृहे.

९. रोजगाराच्या प्रयोजनासाठी संचालक, आदिवासी कल्याण/प्रकल्प अधिकारी/ आदिवासी कल्याण अधिकारी व आदिवासी विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडील अनुसूचित जमातींच्या उमेदवारांची नोंदणी करणे.

१०. अनुसूचित जमाती वर्गीकरण करणे, भारतीय संविधानाच्या तरतुदीखाली अंतर्भूत असलेल्या किंवा प्रस्तावित केलेल्या सूचीमध्ये भर घालणे/वगळणे आणि त्यांची पडताळणी करणे.

११. अनुसूचित जमातींसाठी असलेल्या राखीव जागांवर, शैक्षणिक संस्थांमध्ये अनुसूचित जमातींच्या उमेदवारांना प्रवेश देणे.

१२. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या शिष्यवृत्त्या देणे.

१३. अनुसूचित जमातींकरिता गृहनिर्माण योजना राबविणे.

१४. अनुसूचित जमाती यांच्याकरिता आयुक्तांचा अहवाल ठेवणे.

१५. अनुसूचित क्षेत्र, आदिवासी उपयोजना क्षेत्रे, सुधारित क्षेत्र (विकास पोच एम.ए.डी.ए.) क्षेत्र इत्यादी.

१६. अनुसूचित जमाती कल्याणावरील विधानमंडळ समित्या

१७. अनुसूचित जमातींचे कल्याण (विद्यमान क्षेत्राऐवजी १९८३-८४ च्या अंदाजाच्या आधारावर मागासवर्गीयांचे करावयाचे कल्याण).

१८. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित यासंबंधातील सर्व बाबी.

१९. वरील सूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या आदिवासी विकासासंबंधातील सर्व बाबी.

**दोन. सर्वसाधारण**

२०. आदिवासी विकास विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

२१. या सूचीतील कोणत्याही बाबींच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी ठेवणे.

२२. या सूचीतील कोणत्याही बाबीसंबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

२३. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि आदिवासी विकास विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## २२. पर्यावरण विभागाला नेमून दिलेले विषय

**एक. पर्यावरण विभाग**

१. पर्यावरण व त्यासंबंधातील सर्व बाबी.

२. जल व वायू प्रदूषण यांसह प्रदूषण नियंत्रण व प्रतिबंध.

३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ.

४. धुराचा उपद्रव.

**दोन. सर्वसाधारण**

५. पर्यावरण विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

६. या सूचीतील कोणत्याही बाबींच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी ठेवणे.

७. या सूचीतील कोणत्याही बाबीसंबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

८. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि पर्यावरण विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## २३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. सहकार विभाग (पत आणि साखर)

१. उद्धरण सिंचनासाठी प्राथमिक सहकारी पत संस्था व सहकारी संस्था.

२. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका.

३. नागरी सहकारी बँका.

४. सहकारी पत संस्था व निधी.

५. मुंबई सावकार अधिनियम, १९४६.

६. मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७.

७. हैदराबाद कृषीक ऋणको सहाय्यता अधिनियम, १९५६.

८. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.

९. महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५.

१०. सहकारी न्यायालयांची अधिकारिता व अधिकार.

११. सहकारी ऊस कारखाने (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक ४१ व उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक २४ पहा).

१२. उसाचा भाव ठरविणे.

१३. खांडसरी युनिटासह इतर साखर कारखाने.

१४. महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामविकास बँक.

१५. महाराष्ट्र राज्य सहकारी वित्तीय गृहनिर्माण महामंडळ, मुंबई.

१६. सहकारी गृहनिर्माण संस्था.

१७. महाराष्ट्र राज्य/जिल्हा परिषद कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था, अर्थसहाय्य नियम, १९६७.

### दोन. सहकार विभाग (पणन)

१८. वस्त्रोद्योगासंबंधीच्या औद्योगिक सहकारी संस्था वगळता इतर औद्योगिक सहकारी संस्था म्हणजेच सहकारीतत्त्वावर चालणारे संघटित उद्योग (तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक २५ पहा).

१९. ग्राहक भांडारे.

२०. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय व वस्त्रोद्योग यासंबंधातील सहकारी संस्था वगळता संस्करण, शेती, ग्राहक इत्यादीसाठी असलेल्या सहकारी संस्था (तसेच या अनुसूचितील नोंद क्रमांक ५५ व कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाखालील नोंद क्रमांक २८ पहा).

२१. सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता वगळून बाजार व जत्रा.

२२. बाजार वृत्त व संशोधन आणि समन्वित बाजार वृत्त सेवा.

२३. प्रतवारी व पणन.

२४. धान्य आगारे.

२५. सहकारी पणन संस्थांची कोठारे.

२६. वन कामगार व कामगार कंत्राट संस्था.

२७. सर्वोदय योजना.

२८. कांदा खरेदी योजना.

२९. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ.

३०. महाराष्ट्र राज्य कृषी पणन केंद्र.

३१. वखार अधिनियम.

३२. कृषी उत्पन्न बाजार अधिनियम.

३३. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन संघ मर्यादित.

३४. महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक संघ.

३५. महाराष्ट्र राज्य तेलबिया व्यापार व औद्योगिक सहकारी संस्था (एमओसीआयसीओएल) (मोसीकोल).

३६. महाराष्ट्र राज्य सहकारी तेलबिया उत्पादक पणन संघ, मर्यादित (महाफेड).

३७. कच्च्या कापसाची एकाधिकार प्रापण योजना व त्याचे संलग्न विषय आणि त्यास संलग्न असलेले अधिनियम व नियमावलीची अंमलबजावणी.

३८. महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन संघ.

३९. मुंबई कापूस वटण व दाबणी गिरणी अधिनियम, १९२५.

४०. महाराष्ट्र कच्चा कापूस (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१.

## तीन. वस्त्रोद्योग विभाग

४१. हातमाग, यंत्रमाग व सहकारी सूत गिरणी उद्योग (तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक २५ पहा).

४२. आजारी व बंद पडलेल्या कापड गिरण्या / उपक्रमांना सहाय्य देणे.

४३. मनुष्यनिर्मित तंतूसह इतर सर्व तंतू.

४४. वस्त्रोद्योग धोरण.

४५. औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळ (बायफर) वस्त्रोद्योग कंपन्यांच्या संबंधातील बाबी.

४६. संचालक, हातमाग, यंत्रमाग व सहकारी वस्त्रोद्योग, नागपूर.

४७. पश्चिम महाराष्ट्र विणकर केंद्र सहकारी महासंघ मर्यादित, सोलापूर (वेमकोटेक्स), विदर्भ विणकर केंद्र सहकारी संस्था मर्यादित, नागपूर (व्हीसीडब्ल्यू) व महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, मुंबई (महाटेक्स).

४८. लोकरीचे तयार कपडे, पेशीमय तंतू (एम.एस.आय.डी. चा पैठण्यांचा कारखाना किंवा औरंगाबाद पैठण येथे तयार होणारे रेशमी कापड इत्यादी खेरीज हस्तव्यवसायाद्वारे तयार केलेले कापड).

४९. महाराष्ट्र राज्य वस्त्रनिर्माण महामंडळ.

५०. मराठवाडा वस्त्रनिर्माण महामंडळ मर्यादित (टेक्सकॉम).

५१. खादी.

५२. लोकरी, हातमाग, तयार कपडे, पेशीमय तंतू, ज्यूट उत्पादन यासंबंधात निर्यात होणाऱ्या उत्पादनाचा विकास व विस्तार करणे.

५३. अधिदान आयुक्त.

५४. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ.

५५. सुती कापड नियंत्रण आदेश, १९४८ याची अंमलबजावणी, सूत व बिगर सुतावर चालणाऱ्या यंत्रमागांची प्रतिष्ठापना, स्थलांतर करणे इत्यादी. सूत विक्रेत्यांना परवाने देणे व त्यांचे नूतनीकरण करणे (तसेच अन्न, नागरीपुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाखालील नोंद क्रमांक ५ पहा).

५६. सुती, लोकर, रेशीम किंवा मनुष्यनिर्मित इतर कोणतेही तंतू यांचा वापर करणाऱ्या

औद्योगिक सहकारी संस्था (यात कच्चे साहित्य म्हणून सुती किंवा बिनधुवट कापड तयार करणे व तयार माल/वस्त्र निर्माण करणे).

५७. कापूस, लोकर, रेशीम किंवा मनुष्यनिर्मित इतर कोणतेही तंतू यांचा वापर करणाऱ्या सहकारी संस्करण संस्था (यात संस्करण व तयार माल/वस्त्रनिर्मितीसाठी कच्चे साहित्य म्हणून सुती किंवा बिनधुवट कापड तयार करणे), (तसेच या अनुसूचीतील नोंद क्रमांक २० पहा).

५८. रेशीम उत्पादन.

**चार. सर्वसाधारण**

५९. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

६०. या सूचीतील कोणत्याही बाबींच्या प्रयोजनांसाठी चौकशी व आकडेवारी ठेवणे.

६१. या सुचीतील कोणत्याही बाबींच्या संबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

६२. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## २४. उच्च व तंत्र शिक्षण विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. उच्च शिक्षण विभाग

१. विद्यापीठे व विद्यापीठ शिक्षण (शारीरिक शिक्षणासह).

२. राष्ट्रीय सेवा योजना.

३. राज्य प्रशासकीय व्यवसाय निदेशन संस्था.

४. महाविद्यालयीन शिक्षकांना पुरस्कार देणे.

५. भारतीय प्राणी सर्वेक्षण.

६. या विभागाखालील नोंदीमध्ये समाविष्ट असलेल्या शिक्षणासंबंधातील दरडोई (कॅपिटेशन) फी बाबतच्या बाबी.

७. डेक्कन महाविद्यालय व टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

८. भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र.

९. विद्यापीठ पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ.

१०. संशोधन शिष्यवृत्त्या.

११. राष्ट्रीय कर्ज शिष्यवृत्त्या.

१२. प्रियदर्शिनी वसतिगृह.

१३. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गासाठी वसतिगृह.

१४. या विभागाखालील नोंदीमध्ये अंतर्भूत असलेल्या शिक्षणासंबंधातील सवलतीविषयक बाबी.

### दोन. तंत्र शिक्षण विभाग

१५. तंत्र शिक्षण.

१६. व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण.

१७. उपयोजित कला व वास्तुशास्त्र शिक्षण यासह कला शिक्षण.

१८. शासकीय मुद्रण शाळा.

१९. शिकाऊ उमेदवारी अधिनियम, १९६१.

२०. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी समन्यायाने व्यवस्था करण्यासंबंधीच्या सर्व बाबी.

(शा.म.मु.) एचबी १६१८—७ (४००—११-२०२४)

**तीन. संस्कृती विभाग**

२१. ग्रंथालये.

२२. मुद्रणाधिकार.

२३. उच्च तंत्र शिक्षणाशी संबंधित वृत्तपत्रे व पुस्तके यासंबंधातील बाबी ( तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक ६९, शालेय शिक्षण विभागाखालील नोंद क्रमांक ३९ आणि उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाखालील नोंद क्रमांक १८ पहा ).

२४. संस्कृत दिन, संयुक्त राष्ट्रदिन इत्यादींसारखे दिवस साजरे करणे.

२५. पुस्तक निवड समिती.

२६. सावित्रीबाई फुले पुरस्कार.

२७. महात्मा फुले व डॉ. आंबेडकर चरित्र प्रकाशन समिती.

२८. संतपीठ.

**चार. सर्वसाधारण**

२९. उच्च व तंत्र शिक्षण विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

३०. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी ठेवणे.

३१. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

३२. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## २५. महिला व बालविकास विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. महिला व बालविकास विभाग

१. विस्थापित अनाथ (अनअटॅच्ड) महिला व मुले यांचे परिरक्षण व काळजी घेणे.

२. विमोचगृहे व विनियोजन (बचत) कार्य.

३. सुधारशाळा परंतु यात ब्रोस्टल संस्थांचा समावेश नाही (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक १५ पहा).

४. बाल गुन्हेगारी व बाल गुन्हेगारांचे अनुरक्षण.

५. अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६.

६. अनाथालये व इतर धर्मादाय गृहे (परिरक्षण व नियंत्रण) अधिनियम, १९६०.

७. महिलांसाठी राज्य स्तरीय आयोग.

८. महिला व बाल विकासासंबंधातील कामांचे समन्वयन करणे.

९. केंद्रीय व राज्य समाज कल्याण मंडळाच्या कार्यक्रमाशी संबंधित सर्व बाबी.

१०. शाळापूर्व व शाळेत जाणारी मुले यांच्यासाठी शाळांतर्गत आहार कार्यक्रम राबविणे.

११. परिवीक्षाधीन गुन्हेगार अधिनियम, १९५८, मुंबई सराईत गुन्हेगार अधिनियम, १९५९ आणि सुटका झालेल्या प्रौढ कैद्यांसाठी त्यांच्या सुटकेनंतरचा कार्यक्रम आणि सहाय्य संस्था.

१२. रस्त्यावरील भटकी/अनाथ मुले व त्यांचा विकास.

१३. मुंबई भिक्षा प्रतिबंधक अधिनियम, १९५९ आणि त्याखालील नियम यांच्या प्रशासनासह भिक्षेकरी गृहे, भिक्षेक-यांची मुक्तता.

१४. विवाह व घटस्फोट, अर्भक व अज्ञानांचे दत्तकग्रहण (विवाहांची नोंदणी व्यतिरिक्त), (तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाखालील नोंद क्रमांक १ पहा).

१५. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, १९२९.

### दोन. सर्वसाधारण

१६. महिला व बालविकास विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

१७. या सूचीतील कोणत्याही प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

१८. या सूचीतील कोणत्याही बाबीसंबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

१९. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि महिला व बालविकास विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## २६. कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. कौशल्य विकास आणि उद्योजकता उप विभाग

१. सेवायोजन कार्यालय संघटना.

२. सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार व स्वंयरोजगार योजना (बीज भांडवल योजना वगळून).

३. मनुष्यबळ नियोजन.

४. रोजगार, बेरोजगार व स्वंयरोजगार धोरण (व्यापक धोरण, तत्त्वे आणि समन्यय).

५. रोजगाराच्या विशेष योजनांची अमंलबजावणी (रोजगार हमी योजना वगळून).

६. मंत्रालयातील सर्व विभागातील विविध योजनांचे रोजगार / स्वंयरोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संनियंत्रण, समन्वय आणि पर्यवेक्षण.

### दोन. सर्वसाधारण

७. कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या कक्षातील कोणत्याही बाबी संबंधीत हुकूमान्वये येणे असलेल्या रकमा निर्लेखित करणे.

८. या सुचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनार्थ चौकशी व आकडेवारी.

९. कोणत्याही न्यायालयात घेण्यात येणारी फी वगळून या सूचीतील कोणत्याही बाबींच्या संबंधातील फी.

१०. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली व या विभागाकडे अभिहस्तांकित केलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## २७. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. पर्यटन विभाग

१. पर्यटन.

२. थंड हवेच्या ठिकाणांचा व सुटी शिबिरांचा विकास करणे.

३. विनिर्दिष्ट आस्थापनांसंबंधातील पांथगृहे व पांथगृहपाल (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक ५ पहा).

४. ध्वनीप्रकाश कार्यक्रम.

५. महाराष्ट्र राज्याची आर्थिकदृष्ट्या भरभराट होण्याच्या दृष्टिने पर्यटन क्षेत्राचा विकास करणे आणि राज्याच्या आर्थिक विकासामध्ये पर्यटनाचे योगदान वाढविणे.

६. एकात्मिक पर्यटनाचा विकास करण्याच्या दृष्टिने उद्दिष्टे तयार करणे आणि अस्तित्वात असलेल्या साधन सामुग्रीच्या परिक्रमेत वाढ करणे-किल्ले, बौद्धविहार, सागरी पर्यटन, पर्यावरण आणि वन पर्यटन इत्यादी.

७. महाराष्ट्र राज्य पर्यटनाचा एकात्मिक भाग म्हणून राज्याचा वारसा, संस्कृती, कला, शिल्पे यांचा विकास करणे.

८. निसर्ग, संस्कृती, वारसा यांचे संरक्षण आणि संवर्धन यासाठी साधनसंपत्तीचा प्रमाणबद्ध उपयोग करून घेणे.

९. पर्यटन स्थळांवरील साधनसामग्रीचा विकास करणे आणि पर्यटन सुविधांमध्ये सुधारणा करणे.

१०. माहिती आणि प्रसिद्धी तंत्राच्या सहाय्याने पर्यटकांना आकर्षित करणे व तसा समृद्ध अनुभव पर्यटकांना मिळण्याच्या दृष्टिने प्रयत्न करणे.

११. पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने आवश्यक ती पावले उचलणे.

१२. पर्यटन विकासामधील खाजगी आणि स्थानिक पातळीवरील सहभाग होण्यासाठी मध्यस्थाची भूमिका बजावणे.

१३. पर्यटन विकासाच्या सहाय्याने स्थानिक रोजगारामध्ये वाढ करणे.

१४. विविध प्रदर्शने, मेळे आणि उत्सव यामधून महाराष्ट्रातील पर्यटनविषयक बाबींचे दर्शन घडविणे.

१५. पर्यटन विकासाद्वारे विदेशी चलन प्राप्त करणे.

**दोन. सांस्कृतिक कार्य विभाग**

१६. नवीन चित्रपट केंद्रे स्थापन करण्याची व वाढ करण्याची जबाबदारी.

१७. मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करणे, उत्कृष्ट चित्रपटांचे विषयी अधिनिर्णय देणे व त्यांना पुरस्कार देणे.

१८. राज्याची मालकी असलेली दोन नाट्यगृहे म्हणजे रविंद्र नाट्य मंदिर व रंगभवन ही नाट्यगृहे चालविणे व मुंबई येथील कावसजी जहांगीर सभागृह व कोल्हापूर येथील केशवराव भोसले नाट्यगृह यांचे व्यवस्थापन करणे.

१९. मराठी नाट्य महोत्सव, महाराष्ट्र राज्य संगीत महोत्सव, महाराष्ट्र राज्य तमाशा महोत्सव व महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सव यांचे आयोजन करणे.

२०. सांस्कृतिक व मनोरंजन क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या विभिन्न कलापथकांना व सांस्कृतिक संस्थांना सहाय्यक अनुदान देणे.

२१. संगीत, कला इ.क्षेत्रातील ज्या कलाकारांना वार्धक्यामुळे किंवा अपंगत्वामुळे स्वतःचा निर्वाह करता येत नाही अशा कलाकारांना, नाट्यकलावंतांना व व्यक्तींना अर्थसहाय्य देणे.

२२. भारत सरकारच्या वार्धक्य व एकात्मिकृत योजनेखाली कलाकारांना व लेखकांना अर्थसहाय्य देणे.

२३. नाट्य व संगीत क्षेत्रातील वृद्ध किंवा मृत झालेल्या श्रेष्ठ संगीतकारांच्या जुन्या व दुर्मिळ असलेल्या ग्रामोफोन तबकड्यांची ध्वनिफीत तयार करणे.

२४. जवानांच्या मनोरंजनासाठी सीमा भागात पाठविण्याकरिता सांस्कृतिक कलापथकांची निवड करणे व आंतरराज्यीय कलापथकांचे स्वागत करणे.

२५. नृत्य, नाट्य व संगीत शाळांना सहाय्यक अनुदान देणे.

२६. भारत सरकारचे शिक्षण मंत्रालय आणि शिक्षण विभागाखालील युनेस्को संस्था यांनी पुरस्कृत केलेल्या विदेशी सांस्कृतिक प्रतिनिधी मंडळाशी संबंधित काम.

२७. राष्ट्रीय नाट्य महोत्सवांमध्ये भाग घेण्यासाठी नाट्य पथके पाठविणे.

२८. नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात येणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात भाग घेण्यासाठी लोकनृत्य पथके पाठवणे.

२९. नाट्यगृहे व नाट्यप्रयोग या विषयी धोरणात्मक निर्णय घेणे.

३०. पुरातत्वशास्त्र व संग्रहालय (तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक ४ पहा).

३१. राज्य हिंदी अकादमी.

३२. राज्य सिंधी अकादमी.

३३. वाङ्‌मय पुरस्कार.

३४. राज्य दर्शनिका, स्मृतिग्रंथ इ.

३५. अभिलेख व हस्तलिखिते या संबंधातील कामे (तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक ४ पहा).

३६. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ.

३७. कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर.

३८. रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ.

३९. पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी.

४०. राज्य गुजराथी अकादमी.

**तीन. सर्वसाधारण**

४१. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

४२. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

४३. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधात परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

४४. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## २८. अल्पसंख्याक विकास विभागाला नेमून दिलेले विषय

### एक. अल्पसंख्यांक विकास उप विभाग

१. अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी मा.पंतप्रधानांच्या १५ कलमी कार्यक्रमाचे समन्वयन व आढावा.

२. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वयन.

३. महाराष्ट्र राज्य हज समितीचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण आणि समन्वयन.

४. राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्थांना ना-हरकत प्रमाणपत्रे देण्याबाबत.

५. वक्फ (वक्फ अधिनियमासह) व त्या अनुषंगीक बाबींची शासकीय स्तरावरील अंमलबजावणी, संनियंत्रण व समन्वयन.

६. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण व समन्वयन.

७. महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमी यांचे शासकीय स्तरावरील संनियंत्रण व समन्वयन.

८. न्यायमुर्ती सच्चर समितीच्या स्वीकृत शिफारशींसंबंधातील बाबींची अंमलबजावणी, संनियंत्रण व समन्वयन.

९. अल्पसंख्याकांसाठी केंद्र पुरस्कृत विविध योजनांचे राज्यस्तरीय समन्वयन.

१०. राज्य शासनाने अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी जाहीर केलेल्या सर्व योजनांचे समन्वयन व आढावा.

११. अल्पसंख्याकांच्या विकासाबाबत वेळोवेळी तज्ञांचे / तज्ञ संस्थांचे अभ्यासगट नेमून त्याआधारे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे.

१२. अल्पसंख्याकांशी संबंधित इतर विषय.

### दोन. सर्वसाधारण

१३. अल्पसंख्याक विकास विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

१४. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

१५. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधात परंतू कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

१६. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि अल्पसंख्याक विकास विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## २९. मराठी भाषा विभागाला नेमून दिलेले विषय

१. भाषा संचालनालय व त्यांच्याशी संबंधित शासन स्तरावरील सर्व कामकाजांचे संनियंत्रण व समन्वय.

२. राज्य मराठी विकास संस्था व त्यांच्याशी संबंधित शासन स्तरावरील सर्व कामकाजांचे संनियंत्रण व समन्वय.

३. महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ व त्यांच्याशी संबंधित शासन स्तरावरील सर्व कामकाजांचे संनियंत्रण व समन्वय.

४. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व त्यांच्याशी संबंधित शासन स्तरावरील सर्व कामकाजांचे संनियंत्रण व समन्वय.

५. पाठ्यपुस्तके सोडून मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृती, मराठी कला या सर्व विषयांशी संबंधित उत्तम पुस्तकांना उत्तेजन देण्याकरिता पुस्तक निवड करणेबाबत (पुस्तक निवड समिती) व तद्नुषंगिक बाबी.

६. उत्कृष्ट मराठी वाङ्‌मय पुरस्कार योजना.

७. श्री.पु.भागवत पुरस्कार योजना.

८. विंदा करंदीकर पुरस्कार योजना.

९. मराठी भाषेशी संबंधित इतर बाबी.

१०. हिंदी परीक्षा.

## ३०. इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाला नेमून दिलेले विषय.

१. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या कल्याणाकरिता प्रशासकीय यंत्रणा व महामंडळे.

२. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या कल्याणकारी कामांसाठी समन्वय साधणे.

३. इतर मागासवर्गासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेली अनुदाने.

४. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी वसतिगृहे.

५. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या आश्रमशाळा/उच्च माध्यमिक आश्रमशाळा, विद्यानिकेतन तसेच ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी आश्रमशाळा/निवासी शाळा संबंधित सर्व बाबी.

६. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी सहकारी गृहनिर्माण योजना.

७. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी आंतरजातीय विवाह योजना.

८. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी केंद्र व राज्य शासनाची शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता, विद्यावेतन, व्यावसायिक प्रशिक्षण इ. योजना.

९. सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणासह, सामाजिक कार्यासाठी प्रशिक्षण आणि संशोधन.

१०. सामाजिक कार्याचा समन्वय साधणे.

११. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी विविध कल्याणकारी योजना राबविणे, स्वयंसेवी संस्थांना/अशासकीय संस्थांना आर्थिक सहाय्य व अनुदान देणे.

१२. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या व्यक्तींना/संस्थांना/विद्यार्थ्यांना गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे.

१३. इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

१४. या अनुसूचीतील कोणत्याही बाबींच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

१५. या सूचीतील कोणत्याही बाबींच्या संबंधात परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

१६. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

## ३१. मृद व जलसंधारण विभागाला नेमून दिलेले विषय

१. ६०० हेक्टरपर्यंतची लहान पाटबंधाऱ्यांची कामे.

२. उपसा सिंचन योजना (० ते ६०० हेक्टर).

३. मृदसंधारण व पाणलोट विकास.

४. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ.

५. जल व भू-व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद.

६. जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रम.

७. मृद व जलसंधारण विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

८. या सूचीमधील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

९. या सूचीमधील कोणत्याही बाबीच्या संबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

१०. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि मृद व जलसंधारण विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई